दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के



आम्ही विधानसभेला नाव घेऊन पाडून!

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

मराठा आरक्षणाच्या सर्वपक्षीय बैठकीवर

# बहिष्कार!!

## मनोज जरांगेंनी विरोधकांना सुनावलं • बीडमध्ये मराठा बांधवांची शांतता रॅली • ... तर अनेक पिढ्या बरबाद होऊन जातील

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्य सरकारने दोन दिवसांपूर्वी सर्वपक्षीय बैठक आयोजित केली होती. मात्र, या बैठकीला न जाण्याचा निर्णय विरोधकांनी घेतला होता. आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारने आम्हाला विश्वासात घेतलं नसल्याचे कारण त्यांनी दिलं होतं. त्यानंतर राजकीय वर्तुळात याची बरीच चर्चाही रंगली होती. दरम्यान, यावरून आता मराठा नेते मनोज जरांगे यांनी महाविकास आघाडीवर टीका केली आहे. तसेच त्यांनी सत्ताधाऱ्यांनाही लक्ष्य केलं आहे. ते बीडमधील सभेत बोलत होते.

पुढे बोलताना त्यांनी सरकारलाही लक्ष्य केलं. विरोधीपक्ष बैठकीला आला नाही तरी काही फरक पडणार नाही. पण सत्ताधाऱ्यांची मराठ्यांना आरक्षण देण्याची इच्छा शक्ती आहे की नाही? सरकारची इच्छा शक्ती असेल, तर मग विरोधकांची वाट कशाला बघता, सरकारने मराठ्यांना आरक्षण देऊन द्यावं, किती दिवस तुम्ही कारणं सांगणार आहात? विरोधीपक्षा बैठकीला येत नाही, म्हणून तुम्ही मराठ्यांना आरक्षण देणार नाही का? मुळात आरक्षण देण्याचं सरकारच्या मनात नाही, अशी टीका मनोज जरांगे यांनी केली.

माझ्या मते, सत्ताधारी आणि विरोधात एकाच माळेचे मनी आहेत. तू मारल्यासारखं कर मी रडल्यासारखं करतो, अशी यांची प्रवृत्ती आहे. या दोघांनीही मराठ्यांचा जीव घेण्याचं ठरवले आहे. ७० वर्षांपासून आम्ही नेत्यांना मोठं केलं आहे. पण हे नेते आमच्या मदतीला कधी येतील? आम्ही फक्त आमच्या हक्काचं आरक्षण मागितलं आहे. ओबीसीतून आम्ही १५० वर्षांपासूनचं आरक्षण आहे, तेवढं आम्ही मागितले आहे. मात्र, आरक्षण देण्याऐवजी सत्ताधारी आणि विरोधक ऐकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहेत, असेही ते म्हणाले.

### बीडमधील सर्वच रस्ते गर्दीने झाले ब्लॉक

जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून मराठा समाजबांधव, महिला, तरूणी या बीडमध्ये दाखल झाल्या होत्या होत्या. त्यामुळे गर्दीने बीड शहरातील सर्वच प्रमुख रस्ते ब्लॉक झाले होते. एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत मराठा समाज बांधव रॅलीत सहभागी झाले. बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून रॅलीला सुरुवात होऊन माळीवेस, सुभाष रोड, अण्णा भाऊ साठे चौक, जालना रोडमार्गे ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौकात सांगता झाली.

### नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे?

सत्ताधारी असो किंवा विरोधक, आज आपल्या बाजुने कोणीही नाही. सरकारने विरोधीपक्षाला बैठकीला बोलवलं होतं. मराठा आरक्षणावर ही बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र, त्यांना या बैठकीला न जाण्यासाठी कोणता रोग झाला होता काय माहिती? माझ्या माहितीनुसार मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देण्यासाठी ती बैठक आयोजित करण्यात आली होती. अशावेळी महाविकास आघाडीने ओबीसीतून आरक्षण द्या, असे म्हणायला हवं होतं. मात्र, महाविकास आघाडीचे नेते लपून बसले.



### वंचित बहुजन आघाडीने काय म्हटले?

वंचित बहुजन आघाडीने आपल्या अधिकृत एक्स हँडलवर पोस्ट टाकून सगेसोयरे अध्यादेशाचा विरोध दर्शविला आहे. आरक्षण हा सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी भारतीय संविधानाने दिलेला गंभीर सामाजिक कृती कार्यक्रम आहे. तो सरकारी कार्यक्रम नाही. त्यामुळेच संवैधानिक चौकटीने दिलेल्या मार्गदर्शक नियमांना छेद देऊन अध्यादेश काढता येत नाही, असे वंचितने आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे.




### आता सगेसोयरे संबंधीचा अध्यादेश

मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मंगळवारी (९ जुलै) राज्य सरकारच्यावतीने मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर सर्वपक्षीय बैठक संपन्न झाली. या बैठकीवर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी बहिष्कार टाकला होता. सर्वपक्षीय बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले होते. तसेच या बैठकीनंतर आता सगेसोयरे संबंधीचा अध्यादेश काढला जाऊ शकतो, अशी चर्चा रंगली आहे.

## सशस्त्र दलात १० टक्के पदे राखीव

**धोरण :** केंद्रीय गृहमंत्रालयाची मोठी घोषणा!

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

अग्निवीर योजना जाहीर केल्यापासून ही योजना वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. विरोधकांकडून सातत्याने या योजनेवर टीका केली जात आहे. याचे पडसाद लोकसभेत देखील बघायला मिळाले आहेत. दरम्यान, आता केंद्रीय गृहमंत्रालयाने माजी अग्निवीर जवानांसाठी मोठी घोषणा केली आहे. माजी अग्निवीर जवानांसाठी केंद्रीय सशस्त्र दलात १० टक्के पदे राखीव ठेवली जातील असं केंद्रीय गृहमंत्रालयाने जाहीर केलं आहे.केंद्रीय गृहमंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार आता



सीआयएसएफ, बीएसएफ, सीआरपीएफ आणि आरपीएफ सारख्या सशस्त्र दलात माजी अग्निवीर जवानांसाठी १० टक्के जागा राखीव ठेवण्यात येणार आहेत. तसेच त्यांना शारीरिक चाचणीतदेखील पान २ वर...

## पूजा खेडकरांच्या आईची दमदाटी

**चर्चेतले :** पुण्यातून तडकाफडकी वाशिमला बदली

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

ट्रेनी आएएस अधिकारी पूजा खेडकर या त्यांच्या वेगवेगळ्या कारनाम्यांमुळे चर्चेत आहेत. वरिष्ठ जिल्हाधिकाऱ्यांचं अँटी चेंबर बळकावणे, रुजू होण्याआधीच व्हॉट्स ॲप मेसेज पाठवून केबीन तयार ठेवा सांगणं, ऑडी या खासगी कारवर लाल आणि निळा अंबर दिवा लावणं या सगळ्या गोष्टींमुळे त्या चर्चेत आल्या. त्यांनी त्यांच्या वडिलांसह जिल्हाधिकारी कार्यालय पाहून कुठे बसायचं



ती जागा निवडल्याचीही बाब समोर आली होती. आता पूजा खेडकर यांच्या आईचीही चर्चा रंगली आहे. पूजा पान २ वर...

## शेतमजुराचा मुलगा झाला मंत्रालयात साहेब!

**सक्सेस :** सुंदर कसबेंची नाव कमावले



अनंत जाधव /मस्साजोग

घरातील आठराविश्व दारीद्र्य असतांना गरिब परिस्थितीचा सामना करत

होळ .ता केज जि. बीड येथील शेतमजूरांचा मुलगा कसबे सुंदर आशा हनुमंत याने मनात जिद्द ठेवून ,रात्र दिवस अभ्यास करून मेहनतीच्या जोरावर वयाच्या २५ व्या वर्षी यश संपादन करून मंत्रालयात साहेब होण्याचा बहुमान मिळवला आहे . महाराष्ट्र लोकसेवा अयोग सेवा गट –ब – मार्फत विविध पदासाठी घेण्यात आलेल्या नोव्हेबर वर्ष २०२३ रोजीच्या परिक्षेत मंत्रालय सहाय्यक कक्ष अधिकारी म्हणून निवड झालेल्या सुंदरचा मित्रांकडून सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्र विद्या विभागाच्या प्रांगणात सामनाचे पत्रकार नवनाथ शिंदे ,अनंत जाधव , अजय देशमुख ,ऋषिकेश सानप ,व्याकटेश ढाकणे यांच्या हस्ते मिठाई भरवत आणि भेटवस्तू देऊन सत्कार करून आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

श्यामसुंदर यांचे पहिली ते दहावी पर्यतचे शिक्षण स्वामी विवेकानंद विद्यालय होळ येथे झाले पूर्ण झाले. अकरावी ते बारावी पर्यंतचे शिक्षण योगेश्वरी महाविद्यालय अंबाजोगाई येथे पूर्ण झाले. बारावी नंतर पदवीचे शिक्षण मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगर ,पुणे येथे कला शाखेत पूर्ण केले. अन स्पर्धा परिक्षा करण्याचे ठरवले. घरातील आठराविश्व दारीद्र्य परिस्थिती अनुकूल असल्यामुळे दुसर्याच्या शेतात मोलमजुरी केल्या शिवाय घरची चुल पेटत नव्हती आई ,वडील भाऊ व बहीण अशा कसबे कुटुंबाने जिवन जगण्याचा संघर्ष केला,घरची पान २ वर...

## राज्य अल्पसंख्यांक आयोगाच्या नियुक्त्या!

**अभिनंदनिय** अध्यक्षपदी प्यारे जिया खान तर उपाध्यक्षपदी जैन चेतन

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या अल्पसंख्यांक आयोगाच्या अध्यक्षपदी प्यारे जिया खान यांची नियुक्ती राज्यपालांच्या आदेशान्वये करण्यात आलेली आहे.नियुक्तीनंतर प्यारे जिया खान साहेब यांनी आज (सोमवार ८ जुलै) मुंबई कार्यालयामध्ये पदभार स्वीकारला. तर महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाच्या उपाध्यक्षपदी जैन चेतन साहेब यांनी देखील पदभार स्वीकारला. भारतीय जनता पार्टीचे अल्पसंख्यांक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष शेख एम जमादार गेवराई,व सलीम परवेजीजी चिखली, बुलढाणा नगरपालिकेचे माजी सभापती काजी साहेब या तिघांनी मिळून , अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष उपाध्यक्ष



यादोघांचा शानदार सत्कार करून अभिनंदन केले तसेच पुढील यशस्वी वाटचालीसाठी मनः पूर्वक शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र राज्याच्या अल्पसंख्यांक आयोगाच्या अध्यक्षपदाला कॅबिनेट मंत्री चा दर्जा असतो तर उपाध्यक्ष पदाला राज्य मंत्रिपदाचा दर्जा असतो. अत्यंत जबाबदारी पूर्वक काम पूर्णत्वास नेण्याचे कसब पान २ वर...

### अल्पसंख्यांक मोर्चाकडून सत्कार!

मुंबई मधल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील बदृद्दिन तय्यब्जी मार्ग वरील राज्य अल्पसंख्यांक आयोगाच्या कार्यालयामध्ये प्यारे खान आणि जैन चेतन देढिया यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने अल्पसंख्यांक मोर्चाच्या वतीने शानदार सत्कार करत त्या दोघांचे अभिनंदन केले. सेंट्रल हज कमिटीचे संचालक हाजी एजाज देशमुख,महाराष्ट्र शासन हज कमिटीचे संचालक शकील काजी साहेब इत्यादी मान्यवर यावेळी त्यांच्यासमवेत उपस्थित होते.

# कैलासवासी 'कू'

फेसबुक, ट्विटर, ॲमेझॉन या सगळ्यांस आपल्याप्रमाणे 'देसी' पर्याय शोधण्याचा प्रयत्न चीनमध्येही झाला आणि ती सर्व चिनी उत्पादने अत्यंत यशस्वी ठरली. खरे तर या घटनेचे कोणास आश्चर्य कसे वाटले नाही, याचे आश्चर्य वाटते. देशाच्या सर्वोच्च नेत्याच्या आदेशावरून लाखो, कोट्यवधींनी हे ॲप आपापल्या मोबाइलमधे डाऊनलोड करून घेतले. सर्वोच्च नेत्याच्या साजिंद्यांपाठोपाठ अन्य कोट्यवधी जल्पकांच्या आत्मनिर्भर गँग्सनी देशाच्या प्रतिष्ठेसाठी हातमिळवणी केली आणि हे ॲप वापरण्याचा निर्धार केला. कोण कोणते दीडदमडीचे ट्विटर! हजारो वर्षांची उज्वल परंपरा असलेल्या, महासत्ता होऊ घातलेल्या, विश्वगुरूंची खाण असलेल्या या देशाच्या इभ्रतीचा अपमान करू धजते यामुळे 'सव्वासो क्रोर' भारतीयांना आलेल्या सात्त्विक संतापातून याचा जन्म झालेला. इस्लामधार्जिण्या, पुरोगामी हिंदू धर्म बुडव्यांना याद्वारे चोख उत्तर दिले जात होते. लोकशाहीची जननी असलेल्या प्रदेशाच्या उद्धारासाठी कार्यरत जगातील सर्वात मोठ्या पक्षाच्या अनेक नेत्यांनी, अनुयायांनी याचा स्वीकार केलेला! या पक्षाचे अधिकृत सदस्यच मुळी १० –१२ कोटी. तेव्हा गेला बाजार सर्वोच्च नेत्याच्या आदेशानुसार इतक्या साऱ्यांच्या मोबाइलमधे तरी याचे अस्तित्व असणार. आणि तरीही हे 'कू' नामे ॲप मृत होते हे आश्चर्य आणि त्याचे कोणासही काही वाटत नाही, राष्ट्रीय शोक व्यक्त होत नाही, निती आयोग 'कू'च्या अवस्थेत लक्ष घालत नाही हे महद्आश्चर्य! ते व्यक्त करणे हे कर्तव्य ठरते. याचे कारण एकेकाळच्या 'ट्विटर'ला आणि आताच्या 'एक्स'ला पर्याय म्हणून साधारण पाच वर्षांपूर्वी या पुण्यभूमीत 'कू' या स्वदेशी मायक्रोब्लॉगिंग साइटचा घाट घातला गेला. सुरू झाल्या झाल्या केवढे कौतुक झाले या 'कू'चे. दिल्लीतून साक्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापासून त्या पक्षाच्या राष्ट्र पुनरुत्थानासाठी भूतलावर अवतार घेतलेल्या गल्लीतील साध्या पक्ष कार्यकर्त्यांपर्यंत सगळ्यांनी या स्वदेशी भारतीय ट्विटरानुकरणाचा पुरस्कार केला. तथापि बुधवारी या 'कू'च्या पक्षाने आकाशाकडे पाहात चोच उघडून प्राण सोडले. हा हंत हंत नलिनी गज उज्जहार वगैरे वगैरे.

कारण काय? तर मागणी नाही आणि त्याहीपेक्षा मुख्य म्हणजे गुंतवणूकदार नाहीत. हे आश्चर्यावर आश्चर्य. खरे तर एका आत्मनिर्भर अभिव्यक्तीसाठी संभाव्य महासत्तेतून एकही गुंतवणूकदार 'कू'त गुंतवणूक करण्यासाठी पुढे येऊ नये यास काय म्हणावे? यामागे खरे तर भारताची प्रगती पाहू न शकणाऱ्या पाश्चात्त्य शक्तींचा हात असणार! अन्यथा पंतप्रधानादींनी आशीर्वादलेल्या उपक्रमासाठी एकही मायेचा पूत या देशात उभा राहिला नाही, हे कसे? आणि लागून लागून अशी कितीशी रक्कम या 'कू'पक्ष्यास लागणार होती? गेल्या काही वर्षांत 'कू'ने ५.७ कोटी डॉलर्स उभे केलेले. गेल्या तीन वर्षांत मात्र इतकाही पैसा उभा राहू शकला नाही. अब्जावधींची कंत्राटे मिळवणाऱ्या 'अ'घटित उद्योगपतींसाठी ही इतकी रक्कम म्हणजे खरे गल्ल्यातली चिल्लर. यापेक्षा कित्येक पट विवाहपूर्व सोहळ्यांवर खर्च होते. किंवा शहराशहरांत कबुतरांस चारा घालण्यावर आपल्या देशात तो घालणाऱ्यांकडून अधिक रक्कम खर्च होत असेल. पण त्यातील काही दाणेही या 'कू'पक्ष्याच्या वाट्यास येऊ नयेत? जवळपास सहा कोटी मोबाइलमध्ये हे ॲप होते एकेकाळी. 'ट्विटर'ची डिट्टो प्रतिकृती असलेल्या या भारतीय अनुकरणाचे कौतुक फक्त भारतीयांनाच होते असे अजिबात नाही.

रोनाल्डिनोसारखा फुटबॉलपटू, दलाई लामा यांच्यासारखे धर्मगुरू असे अनेकजण 'कू' वापरत. 'ट्विटर' पूर्णपणे एलॉन मस्क याच्या हाती गेल्यावर तर ब्राझीलमधे 'कू'चे अनुयायी इतके वाढले की पाहता पाहता त्या देशातही 'ट्विटर' मागे पडले. अर्थात त्यामागे 'कू'चे नाममाहात्म्य होते, हे दुर्लक्षता येणार नाही हे खरे. एकेकाळची पोर्तुगालची वसाहत असलेल्या ब्राझीलमधे पोर्तुगीज बोलणारे अधिक असणार हे उघड आहे. पोर्तुगीज भाषेत 'कू' म्हणजे मानवाचा पार्श्वभाग. या 'वास्तवा'मुळे 'कू' त्या देशात समाजमाध्यमी कमालीचे लोकप्रिय ठरले. ब्राझीलमधील सर्वात मोठे 'कू' असा त्याचा उल्लेख होत असे. तरीही हा 'कू' पक्षी मृत झाला. त्याच्या प्रवर्तकांनी 'कू'स मूठमाती देत असल्याची अधिकृत घोषणा केली. असे का झाले असावे? या पार्श्वभूमीवर या पाश्चात्त्य यशोगाथांना चीनने शोधलेल्या यशस्वी प्रत्युत्तरांचा दाखला देणे योग्य ठरेल. फेसबुक, ट्विटर, ॲमेझॉन इत्यादींतून पाश्चात्त्य यशोगाथा तेवढी समोर येते. या सगळ्यास आपल्याप्रमाणे 'देसी' पर्याय शोधण्याचा प्रयत्न चीनमध्येही झाला. फरक इतकाच की सर्व चिनी उत्पादने अत्यंत यशस्वी ठरली. फ`सबुकला सिना वेईबो, ट्विटरला वेईबो, अमेझॉनला अलीबाबा असे एकापेक्षा एक अत्यंत यशस्वी पर्याय चीनने दिले. आज भारतासह अनेक पाश्चात्त्य देशांत चीनच्या 'बीवायडी' नामे विजेवर चालणाऱ्या गाड्या धावू लागल्या असून अमेरिकी टेस्लाचे धाबे त्यामुळे दणाणलेले आहे. भारतात तर 'बीवायडी'च्या टॅक्सी सर्रास दिसू लागल्या आहेत. म्हणून 'कू'चे असे अकाली कैलासवासी होणे वेदनादायी आहे. भारतीय नवउद्यामी नामशेष करणारी ही 'कू'प्रथा कधी तरी संपेल, ही आशा.

# वाढत्या लोकसंख्येमुळे शहरांचा जीव गुदमरतो आहे !



जगन घाणेकर
मुंबई,मो.९६६४५५९७८०



जागतिक लोकसंख्या दिन नुकताच पार पडला. पूर्वीच्या काळी वैद्यकीय सोयी सुविधांचा आभाव होता, त्यामुळे एखादा साथीचा रोग आला की मोठ्या प्रमाणात माणसे मृत्युमुखी पडत. विज्ञानाने जशी प्रगती केली तशी असाध्य वाटणाऱ्या आजारांवरही उपचार निघाले आणि हळुहळू मृत्युदर कमी होऊ लागला. भारतासारख्या प्रगत राष्ट्रात आज रोगराईमुळे होणाऱ्या मृत्यचे प्रमाण अत्यल्प आहे त्या तुलनेत जन्मदर कमालीचा आहे, परिणामी लोकसंख्येत झपाट्याने वाढ होत. आज भारत जागतिक पातळीवर सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला आहे. वाढत्या लोकसंख्येसोबत रोजगाराचाही प्रश्न उद्भवत असल्याने देशातील प्रगत आणि प्रगतशील शहरांच्या दिशेने देशभरातून प्रतिदिन लोकांचे लोंढेच्या लोंढे वाहत असतात. ज्याचा ताण तेथील व्यवस्थेवर होत असतो.

चीनमध्ये वाढती लोकसंख्या देशाच्या विकासावर परिणाम करत असल्याचे लक्षात येताच तेथील सरकारने लोकसंख्येवर नियंत्रण आणण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरु केले. १९७९ सालापासून चीनने एकल अपत्य धोरण देशभरात सक्तीने राबवले. ज्यामुळे सुमारे ४०० दशलक्ष नवीन जन्म चीनला रोखता आले. भूभागाच्या बाबतीत भारताच्या तीन पटीने मोठ्या असलेल्या चीनने लोकसंख्येच्या बाबतीत मागील अनेक दशकांपासून आपले नाव पहिल्या क्रमांकावर कायम ठेवले होते. वाढत्या लोकसंख्येमुळे देशाचा विकास खुंटत असल्याचे लक्षात आल्यावर मात्र चीनने ती रोखण्यासाठी पुष्कळ मेहेनत घेतली. एप्रिल २०२३ मध्ये भारत हा चीनला मागे टाकून जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला. विकासाच्या बाता करणाऱ्या आपल्या सरकारने मात्र वाढत्या लोकसंख्येचेही भांडवल बनवले. मानवाच्या मूलभूत गरजा पुरवणारे नैसर्गिक स्त्रोत मर्यादित असल्याने वाढत्या लोकसंख्येचा ताण त्यावर पडत आहे. शहरासारख्या ठिकाणी पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांची संख्या आणि क्षमता मर्यादित आहे. अल्प पावसामुळे ही जलाशये भरली नाहीत तर पाणीकपातीचे संकट ओढवते. शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे हे संकट वर्षागणिक अधिक भयावह होऊ लागले आहे. रोजगारासाठी शहरांकडे जाणाऱ्यांमध्ये परप्रांतीयही असतात आणि बांगलादेशी घुसखोरही असतात. यांच्या निवासासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि झोपडपट्टी दादा यांच्या आशीर्वादाने ठिकठिकाणी अनधिकृत वस्त्या आणि झोपडपट्या निर्माण होऊ लागल्या आहेत. मतांच्या लाचारीसाठी हे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासाठी वीज आणि पाणी यांसह कागदपत्रांची आणि रोजगाराची सोयही करून देतात. या सर्वांमुळे मागील अनेक पिढ्यांपासून शहरांत राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ लागला आहे. वाढत्या उद्योगधंद्यासह शहरांतील श्रीमंतांची संख्याही वाढल्याने शहरांत ठिकठिकाणी टोलेजंग इमारती उभ्या राहू लागल्या आहेत. नागरिकांच्या सुविधेसाठी मेट्रो–मोनो प्रकल्प उभे राहू लागले आहेत, एकावर एक उड्डानपूल रचले जात आहेत. या सर्वांसाठी झाडांची आणि नैसर्गिक संपत्तीची सर्रासपणे कत्तल केली जात आहे. वर्षानुवर्षे चालणाऱ्या या कमांमुळे जागोजागी वाहतूक कोंडी होऊ लागली आहे. या सर्वांचा परिणाम शहरांतील एकूण वातावरणावर होतं असून शहरातील हवा दिवसांगाणिक प्रदूषित होऊ लागली. हवेतील विषारी घटक नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम करू लागले आहेत. लहान मुले, वयोवृद्ध, गर्भवती स्त्रिया यांचे आरोग्य धोक्यात येऊ लागले आहे. दमा, हृदयविकार, रक्तदाब यांसारखे विकार सामान्य बनू लागले आहेत. सर्व सुविधा हाताशी असतानाही शहरांतील नागरिकांचे सरासरी आयुर्मान घटू लागले आहे. आज लोकसंख्येवर नियंत्रण आणले नाही तर भविष्यात शहरी भागांत जगणेही अवघड होईल हे निश्चित !

## पान सहा वरून

**रोजगार हमी योजनेत**

करणारे परळी पंचायत समिती मधील तांत्रिक अधिकारी पोलशेटवार ए. ए.पंचायत समिती परळी ऑपरेटर पिटलेवाड व बेलंबा येथील ग्रामरोजगार सेवक सुरेश बलभीम गित्ते यांनी शासन नियमबाह्य कामकाज करून पांडुरंग खंडू सरवदे रा. बेलंबा यांना विहीर न खोदता सदरील विहिरीसाठी १ लाख १२ हजार २०३ रुपये मजुरांच्या नावे रोजगार हमी कायदा व शासन निर्णय डावलून देण्यात आले. तशी तक्रार वंचित बहुजन आघाडीचे युवा महासचिव ज्ञानेश्वर जीवन गित्ते यांनी परळी पंचायत समिती गटविकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली होती. सदरील निवेदनाची दखल घेऊन तत्कालीन विस्तार अधिकारी यांनी दि. ८ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन चौकशी केली असता शेतामध्ये विहिरीचे खोदकाम झालेले नाही असा अहवाल सादर केला होता.

**रिपाइंच्या मध्यस्थितीने**

बबन साळवे,योगेश पवार रिपब्लिकन सेना तालुका अध्यक्ष ,संदीप साळवे, रॉबर्ट ,माधव विधाते,विधाते सर यांनी तहसीलदार यांच्याशी तांत्रिक अडचणी बाबत चर्चा केली, कारवाई बाबत महसूल आधी नियमातील मुदती बाबत लागणारा कालावधी व उपोषण कर्त्याची फेर पंचनामा मागणी या विषयी चर्चा झाल्यानंतर व तहसीलदार यांनी उपोषण कर्त्या महिला यांनीं उपोषणा करिता केलेली मागणी या बाबत साकारात्मक भूमिका घेतली .परंतु दंड कोणाला करायचा असा प्रश्न निर्माण झाल्यामुळे या बाबत सविस्तर अहवाल पुनच्ष करण्याच्या सूचना देऊन उपोषणाचामार्ग मोकळा केला .मागील १० दिवसा पासून महसूल प्रशासना कडे न्याय मागणाऱ्या मंगल विधाते यांना कारवाई बाबत लेखी व तोंडी आश्वासन मिळाले

**पुलाचे काम गतीने**

पुलाच्या बांधकामाची पाहणी केली. हे काम गतीने पूर्ण न झाल्यास तलावालगतच करण्यात आलेला पर्यायी रस्ता वाहून जाण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. असे झाल्यास वाहतूक विस्कळीत होऊन बीड व परळी भागाचा संपर्क तुटू शकतो, त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग विभागाने दक्षता घेण्याची गरज आहे, अशा सूचना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केल्या. त्यानंतर राष्ट्रीय महामार्गचे बीड विभागाचे उपअभियंता राजेंद्र भोपळे, व्यवस्थापक विनोद करडमोल यांनी प्राधान्याने पुलाचे बांधकाम पूर्ण करून त्या भागातून वाहतूक व्यवस्था सुरळीत करून देण्याची ग्वाही दिली आहे. यावेळी नाळवंडीचे सरपंच ड.राजेंद्र राऊत यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

**बीडीओंच्या रुबाबात**

पाहिजे असेल तर त्यांची सही घेण्यासाठी अंबाजोगाईला चक्करा माराव्या लागतात अशा प्रकारच्या निकामी अधिकारी केज पंचायत समितीच्या बीडीओ मॅडम आहेत व त्या विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांच्या सांगण्यावरून वागत असल्याचे जनतेतून बोलले जात आहे. तरी एखाद्या सरकारी अधिकारी, कर्मचारी जर राजकीय नेत्यांच्या सांगण्यावरून वागत असेल तर संमंधीत प्रशासनाने कडक कारवाई केली पाहिजे असे नागरिकांना मध्ये चर्चा सत्र सुरू झाले आहे . तसेच केज पंचायत समिती बीडीओ मॅडमचे कार्यालयाला कायम कुलुप असते अशा मनमानी कारभाराने वागत असलेल्या केज पंचायत समितीच्या बीडीओ मॅडम यांच्या वर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

**आभासी तंत्रज्ञानने**

आभासी तंत्रज्ञान ( अग्युमेंटेड रिऍलिटी आणि व्हरच्युअल रिऍलिटी ) चा फायदा होत आहे. चष्मा, मोबाईल आणि तठ युनिट च्या माध्यमातून हे अध्यापन केले जात आहे. मुलांना ३ऊ गेम्स आणि कार्टून याची आवड असते. या तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणात केल्यास विद्यार्थ्यामध्ये शिक्षण विषयक आवड निर्माण होण्यात मदत होत आहे. या उपकारणाच्या माध्यमातून आभासी जगात विद्यार्थ्यांना नेऊन त्यांची कल्पना शक्ती विकसित होण्यास मदत होत आहे. या नवीन उपक्रमाचे शाळेच्या वतीने कौतुक होत आहे.

**प्रतिभावंत कलावंतांचे**

निमित्ताने रंगकर्मी नंदू वाघमारे यांचा भव्य सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शिवसेना उपतालुकाप्रमुख घनसावंगी रमेश दादा तौर, रघुनाथ ताठे पाटील किसान मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष जालना, ज्ञानेश्वर माऊली आर्दड शिवसेनेचे नेते बाळराजे आर्दड ,ज्ञानेश्वर काळे ,उपक्रमशील शिक्षक वैजनाथ आर्दड, आयुष अकॅडमी ऑफ परफॉर्मिंग आर्टसचे संचालक हरिदास घुगासे ,सत्कारमूर्ती नंदू वाघमारे यांची उपस्थिती होती.

**भारतानं जगाला**

प्रयत्न करत आहे, असं मोदींनी यावेळी नमूद केलं.गेल्या हजारो वर्षांपासून भारतानं आपलं ज्ञान आणि कौशल्य जगभरात इतरांना दिलं आहे. आपण जगाला युद्ध दिलेलं नाही, तर बुद्ध दिला आहे. भारतानं नेहमीच जगाला शांतता आणि समृद्धी दिली. त्यामुळे २१व्या शतकात भारत जागतिक पटलावर महत्त्वाची भूमिका बजावणार आहे, असा विश्वास यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी व्हिएन्नामधील भारतीयांसमोर व्यक्त केला.

**१३५० गावात**

माहे डिसेंबर २०२४ पर्यंत हागणदारीमुक्त अधिक मॉडेल करावयाचे आहे. मॉडेल झालेल्या गावात दृष्यमान शाश्वत स्वच्छता ठेवणे आणि हागणदारीमुक्त अधिक झालेली गावे मॉडेल करणे यासाठी विविध विषयाच्या अनुषंगाने गृहभेटीच्या माध्यमातून जनजागृतीसाठी विशेष अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक गावात ५ संवादकाची निवड करण्यात येणार असून हे संवादक प्रत्येकाच्या घरी जावून संदेश देणार आहेत. यात सरपंच, उपसरंपच, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामसेवक, आशावर्कर, अंगणवाडी सेविका, स्वच्छाग्रही व बचत गटातील महिलांचा पाणी गुरुदत्त तपासणीतील पाच कुशल महिला जलसुरक्षक यांच्या माध्यमातून अतिसार थांबवा उपक्रमाची जनजागृती व उपायोजना करणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील यांनी दिली आहे. ओला कचरा हिरव्या रंगाच्या डब्यात ठेवावा. तसेच सुका कचरा निळ्या रंगाच्या डब्यात ठेवण्यासंदर्भात तसेच नियमित शौचालयाचा वापर करणे, शास्त्रयुक्त पध्दतीने घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, गोबरधन, प्लास्टिक व्यवस्थापन, सुयोग्य मैला गाळ व्यवस्थापन, सार्वजनिक शौचालय आणि नियमित वापर आदि बाबत गृहभेटीतून माहिती देण्यात येणार आहे. भेटी दरम्यान गुगल लींकव्दारे भेट दिलेल्या कुटुंबाची फोटोसह माहिती शासनास पाठविणार आहे. असल्याची माहिती पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुधाकर मुंडे यांनी दिली आहे.गट विकास अधिकारी यांनी आपल्या तालुक्यातील गावांचे प्रती कुटूंब पाच या प्रमाणे संवादक तयार करुन गृहभेटीचे आयोजन करावे. या कामी तालुक्यातील सर्व अधिकारी, विस्तार अधिकारी यांनी संनियंत्रण करुन अंमलबजावधी करावी. दर आठवडयाला या अभियानाचा जिल्हास्तरावरुन आढावा घेण्यात येणार असल्याची माहिती ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर ज्ञानोबा मोकाटे यांनी दिली आहे.

**शासकीय रुग्णालयाचा**

कर्मचारी व डॉक्टरांना रुग्णालय जसे काय धर्मशाळा आहे असे वाटत आहे त्यामुळे रुग्णालयात रुग्णांची गैरसोय होत आहे व शासन पगार घेऊन कामचुकार पना करणाऱ्या केज उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचारी व सोनोग्राफी मशीन अनेक महीण्या पासुन बंद आहे तरी अशा डॉक्टर यांच्या वर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे .

## पान एक वरून

**सशस्त्र दलात...**

शिथीलता देण्यात येणार असल्याची माहिती आहे. याशिवाय त्यांना वयोमर्यादेतसुद्धा सूट मिळणार आहे. पहिल्या तुकडीसाठी पाच वर्ष तर पुढच्या तुकड्यांसाठी तीन वर्षांची सुट मिळणार असल्याचे सांगितले जाते आहे.यासंदर्भात बोलताना, सीआरपीएफचे महासंचालक अनिश दयाल म्हणाले, सीआरपीएफमध्ये माजी अग्निवीरांच्या भरती प्रकिक्रयेसंदर्भातील सर्व व्यवस्था झाली आहे. माजी अग्निवीरांच्या पहिल्या तुकडीला वयोमर्यादेत ५ वर्षांची सूट दिली जाणार आहे. तसेच त्यांनी शारीरिक चाचणीतदेखील सूट दिली जाणार आहे. याशिवाय सीआयएसएफनेही यासंदर्भात सर्व तयारी केली असल्याची माहिती सीआयएसएफच्या महासंचालक नीना सिंह यांनी दिली आहे.

**पूजा खेडकरांच्या...**

खेडकर यांच्या आईने पोलिसांना आणि माध्यमांना दमदाटी केली आहे.पुण्यातल्या प्रोबेशनरी सनदी अधिकारी पूजा खेडकर यांची सध्या जोरदार चर्चा सुरु झाली आहे. याचं कारण त्यांची पुण्यातून तडकाफडकी वाशिमला बदली करण्यात आली आहे. याची कारणही तशीच आहेत. पूजा खेडकर या आता वाशिमच्या जिल्हाधिकारी असणार आहेत. पूजा खेडकर यांनी चमकोगिरी केल्याने त्यांची बदली करण्यात आली आहे. व्हिआयपी नंबरप्लेट असलेल्या ऑडी कारला लाल आणि निळा दिवा लावणे, पुणे जिल्ह्यात रुजू होण्यापूर्वीच निवासी जिल्हाधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांना व्हॉट्स ॲप मेसेज करुन त्यांच्यासाठी स्वतंत्र आसन व्यवस्था, कार, निवासस्थान आणि शिपाई या संबंधीची मागणी वारंवर केली. तसंच परिविक्षाधीन (प्रोबेशनरी) सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून रुजू झाल्यानंतर पहिल्याच दिवसापासून याबाबत विचारणा केली. ज्यानंतर त्यांची आता वाशिमला बदली करण्यात आली आहे. एकीकडे पूजा खेडकर यांची चर्चा सुरु असतानाच आता त्यांच्या आईने पोलिसांना आणि माध्यमांना दमदाटी केली आहे. सगळ्यांनी बाजूला व्हा, इथे यायचं नाही. आलात तर एकेकाला आत टाकेन. असं म्हणत पूजा खेडकर यांच्या आईने दादागिरी केल्याची माहिती समोर आली आहे. त्यांचा व्हिडीओही समोर आला आहे. पूजा खेडकर यांच्या आईचं नाव मनोरमा खेडकर आहे.

**शेतमजुराचा मुलगा**

परिस्थिती अनुकूल , बेताची असल्यामुळे लहानपणापासुनच मनात जिद्द आणि अधिकारी होण्याच स्वप्न बाळगल्याने पुणे येथे शिक्षण घेत असतांना कमवा आणि शिका या योजनेमध्ये काम केले.अभ्यास करताना खूप अडचनिचा सामना करावा लागला.परंतु मोठा भाऊ चंद्रसेन( भारतीय सैन्य दलांत कार्यरत असल्याने )श्यामसुंदरला सगळ्या प्रकारे मदतीचा स्वरूपात पाठिंबा देऊन आणि आई वडील यांनी गावी दुसऱ्याच्या शेतात मोलमजुरी करून सुंदरला शिक्षणासाठी पैसा पुरवला . आभ्यासातील सातत्य ठेवत जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर शिका ,संघटित व्हा आणि संघर्ष करा ह्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित होऊन महाराष्ट्र लोकसेवा अयोग सेवा गट –ब – मार्फत विविध पदासाठी घेण्यात आलेल्या एप्रिल २०२३ रोजी प्री आणि नोव्हेबर वर्ष २०२३ मेन्स या दोन्ही परिक्षेत सुंदर कसबे याने दोन वेळेस अपयश पचवून तिसऱ्या प्रयत्नात दिनांक ५ जूलै शुक्रवार रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा गट –ब परिक्षेचा निकाल जाहीर झाला त्यात घवघवीत यश मिळवले आहे.

सुंदर कसबे याने घरची परिस्थिती हलाखीची असतांना त्या परिस्थितीवर मात करत मंत्रालयात अधिकारी होण्याचे आई वडिलांचे स्वप्न पूर्ण केले आहे .त्यामुळे सुंदरचे गावातील ग्रामस्थांकडून राज्यभरातील नातेवाईकांकडून , मित्रपरिवारांकडून कौतूक होत आहे

**राज्य अल्पसंख्यांक**

आणि अल्पसंख्यांक कॅटेगिरी मध्ये समाविष्ट असलेल्या प्रत्येक पंथ आणि धर्म यांना सांभाळून घेण्याची सर्वसमावेशक हातोटी असल्यामुळेच प्यारे जिया खान आणि जैन चेतन देढीया यांची अध्यक्ष व उपाध्यक्ष पदी नियुक्ती झाली असल्याची प्रतिक्रिया शेख एम जमादार यांनी दिली. ते पुढे म्हणाले की योग्य व्यक्तींना योग्य पदी विराजमान केल्याबद्दल मी देशाचे रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी साहेब, मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब आणि उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब तसेच प्रदेश उपाध्यक्ष बावनकुळे जी यांचे मनःपूर्वक आभार मानतो. मला खात्री आहे की अल्पसंख्यांक समाजातील बांधवांचे प्रश्न धसास लावण्याची धमक प्यारे खान यांच्या मध्ये आहे. ते अल्पसंख्यांक, मुस्लिम, समाजाची आन बान आणि शान आहे.तसेच मला ठाम विश्वास आहे की भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र राज्य चे अल्पसंख्यांक मोर्चाच्या माध्यमातून प्यारे खान साहेब यांना मनातून सहकार्य केले जाईल.तसेच प्यारे खान यांचे अत्यंत निकट वर्तीय असणारे शकील काझी यांची देखील शेख एम जमादार यांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. शकील काझी व त्यांचे सर्व सहकारी प्रामाणिक, उद्दिष्ट पूर्तीसाठी झोकून देऊन काम करणारी माणसं प्यारे खान साहेब यांच्यासोबत असल्यामुळे त्यांचा पुढील पाच वर्षांतील कालखंड हा अत्यंत यशस्वी असणार आहे. तसेच ते अल्पसंख्यांक मधील मुस्लिम, जैन ,ख्रिश्चन, शीख, इसाई, या सर्वांच्या अडीअडचणी दूर करतील असा आत्मविश्वास शेख जमादार यांनी व्यक्त केला आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# ढगफुटीमुळे कांबळी नदीला आला पूर

**अस्मानी** — पावसाने पिके उद्धवस्त, पूल, रस्ते उखडले

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील हिवरा, सुलेमान देवळा, भोजेवाडी, पिंपरखेड परिसरात सोमवारी सायंकाळी ५.३० वाजेदरम्यान ढगफुटीसदृश पाऊस झाला. यामुळे या परिसरातील पिके उद्धवस्त झाली आहेत. तर कांबळी नदीला पूर आल्याने हिवरा–दादेगाव, धानोरा–देवळा रस्त्यावरील पूल खचले आहेत. तर रस्ते उखडून गेले आहेत. दरम्यान, पिंपरखेड येथील एक मोटारसायकलस्वार वाहून गेला होता, परंतु तो बचावला आहे.

सोमवारी सायंकाळी ५.३० ते रात्री ८ वाजेदरम्यान हिवरा, देवळा, अंभोरा, पिंपरखेड, भोजेवाडी या गावात ढगफुटी झाली. या पावसाने खरीप हंगामातील बाजरी, कांदा, मूग, उडीद, सोयाबीन पिके अनेक ठिकाणी वाहून गेली आहेत. यामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण आहे. या पावसाने कांबळी नदीला पूर आला होता. यामुळे हिवरा–दादेगाव, धानोरा–सुलेमान देवळा, भोजेवाडीकडे जाणारी वाहतूक रात्री ठप्प झाली होती. दरम्यान, धानोरा– हिवरा रोडवर कांबळी नदीच्या पुलावर पिंपरखेड येथील बाळू चांगण नावाची व्यक्ती मोटारसायकलसह वाहून गेली होती. परंतु यात ती व्यक्ती बचावली आहे. तरी या परिसरातील पिकांच्या नुकसानीची पाहणी करून पंचनामे करावेत, अशी मागणी सरपंच बाबासाहेब गोफणे, युवक नेते अमोल लगड यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे.



हिवरा–दादेगाव रस्ता, पूल उखडला आहे. गावातील सिमेंट रस्ता वाहून गेला आहे. तरी या रस्त्याच्या कामाची चौकशी करून पुलासह रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अन्यथा आंदोलन छेडले जाईल.
–सोमनाथ लगड, उपसरपंच, हिवरा.

### रस्ते, पूल उखडले

कांबळी नदीवरील हिवरा–दादेगाव रोडवरील पुलाला भगदाड पडले आहे. सहा महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून हिवरा– दादेगाव रोडचे काम झाले होते. अधिकाऱ्यांच्या संगनमताने ठेकेदारांनी रस्त्याचे काम निकृष्ट केले होते. याबाबत ग्रामपंचायत, ग्रामस्थांनी वेळोवेळी तक्रार केली होती. परंतु अधिकाऱ्यानी याकडे दुर्लक्ष केले.

## वाढत्या चोऱ्याबाबत दिले लेखी निवेद

**रंजित बनसोडे :** जिल्हाधिकारी यांना भेटून दिले निवेदन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रभाग क्र.२४ चे नगरसेवक रणजित बनसोडे यांनी प्रभागातील पाणी प्रश्न, रस्त्याचा प्रश्न तसेच वाढत्या चोर्यांबाबत नागरिक भयभीत झाले आहेत तसेच संबंधित विभागाचे अधिकारी यांना याबाबत लेखी निवेदन देवून देखील कसलीही कार्यवाही न झाल्याने जिल्हाधिकारी यांनी आपल्या स्तरावुन प्रश्न सोडवण्याची विनंती केली आहे.

पुढे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, १५ ते १८ दिवसाला सुटणारे पाणी हा जिव्हाळ्याचा प्रश्न, धानोरा रोडच्या रस्त्याचा प्रश्न, अंकुश नगरच्या रस्त्याचा प्रश्न आणि वाढत्या चोर्यांबाबत संबंधित विभागाच्या अधिकारी यांना पाठपुरावा केला होता परंतू हे प्रश्न न सुटल्याने जिल्हाधिकारी यांनी याबाबत लक्ष घालावे अशी विनंती केली. व धानोरा रोड व अंकुश नगर रस्ता हे महत्वाचे प्रश्न सुटत नसल्याने खंत वाटत असून नागरिकाचा रस्त्याचा वनवास संपेल कधी याची खंत वाटत असून मावेजा प्रश्न सोड़वा भूसपादनाचे पत्र दया आणि रस्ता काम सुरु करा अशी मागणी करुण माजी जिल्हाधिकारी यांचा सत्कार करुन त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.यावेळी शितल जाधव, शैला वारे,जयश्री रनसींग,रेहाना पठान, खुर्शीद आलम,नगरसेवक रंजीत बनसोडे आदी उपस्थित होते.

## मूर्ती लहान पण कीर्ती महान; स्केटिंगमध्ये शांभवीची सुवर्ण झळाळी

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

'मूर्ती लहान पण कीर्ती महान' असे काही लोकांच्या बाबतीत म्हटले जाते. यात लहान मूर्ती म्हणजे बर्याचदा उंची आणि वय याच्याशी संबंधित असते. पण यांच्या कामगिरीपुढे या सर्व गोष्टी गौण ठरू लागतात आणि ही लहान मूर्ती महान काम करून नावलौकिक मिळवतात. अशीच एक लहान मूर्ती आपल्या कीर्तीने केवळ आपले वा कुटुंबाचेच नाव नव्हे तर शाळेचे नावदेखील मोठे करत आहे, यशाचे नवनवे शिखर गाठून भल्याभल्यांना अचंबित करीत आहे.




अशा या अतुलनीय कामगिरी करणार्या लहान खेळाडूचे नाव आहे, शांभवी अविनाश गोगावले वय वर्ष ५ फक्त . यश कसे असते याचे वर्णन करणार्या वरील चार ओळी शांभवीला तंतोतंत लागू पडतात. कै हनुमंतराव तुकाराम थोरवे शाळा १६२बी मनपा शाळा भारती विद्यापीठ पुणे येथे शिकणार्या शांभवी अविनाश गोगावले हिने 'स्केटिंग'मध्ये यशस्वितेची जी भरारी घेतली आहे, ती अनेकांना आश्चर्याचा सुखद धक्का देणारी आणि प्रेरणादायी आहे.लहान मुले ही मोठ्यांचे अनुकरण करीत असतात. शांभवीच्या बाबतीत काहीसा असाच प्रकार झालेला पाहायला मिळतो. ती साडेतीन वर्षांची असल्यापासून 'स्केटिंग' करते आहे. तिच्यात ही आवड निर्माण झाली ती तिची बहीण विश्वजा हिला 'स्केटिंग' करताना पाहून. विश्वजा ही तिची मोठी बहीण असून ती नियमित 'स्केटिंग'ला जाते.

# नारायणगड पंढरपूर दिंडीचे स्वागत

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेली शेकडो वर्षापासून श्री क्षेत्र नारायणगडाची पंढरपूर आषाढी वारीची परंपरा आजही मोठ्या उत्साहात जतन केली आहे. श्री. क्षेत्र नारायणगडाचे महंत प्रेममूर्ती ह.भ.प. शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली नारयणगड येथून हजारो वारकऱ्यांसह दिंडीचे परवा पंढरपुरकडे प्रस्थान झाले. भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी वैद्यकिन्ही येथे दिंडीचे स्वागत करून महाराजांचे आशीर्वाद घेतले. भरपूर पाऊस, उत्तम पिक पाणी आणि बळीराजाला सुख लाभूदे असे साकडे पांडुरंगाला घालून दिंडीला निरोप दिला.



पंढरीची वारी हा पृथ्वीतलावरील अभूतपूर्व सोहळा म्हणजे कल्याण, आत्मिक उद्धार, ईश्वर प्राप्ती आणि समतेचा संदेश देणारी वारी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून रामकृष्ण हरीचा जयघोष करत पंढरीच्या दिशेने धावणाऱ्या वारकऱ्यांसाठी आषाढी वारी म्हणजे पांडुरंगानेच वारकऱ्यांना घातलेली साद होय. कोणतेही निमंत्रन नसताना लाखोच्या संखेने विठ्ठल भक्त एकत्र येऊन, हरिनामाच्या गजरात गुण्या गोविंदाने पायी वाटचाल करत असतात. आपसातील आपपर भाव विसरून सकल जन समुदायाच्या कल्याणासाठी पांडुरंगाला प्रार्थना करणारा हा सात्विक सोहळा सर्व सामान्य ईश्वर भक्तांना प्रेरणा आणि बळ देणारा आहे. अध्यात्म, संस्कार आणि भक्तीचा संदेश देण्याचे अखंड काम श्री क्षेत्र नारायणगड येथे अविरतपणे चालू आहे. महाराष्ट्राची धाकटी पंढरी म्हणून श्री क्षेत्र नारायणगडाचा मला अभिमान आहे. असे भाव उद्गार राजेंद्र मस्के यांनी पंढरपूर वारीसाठी जाणाऱ्या भाविक भक्तासमोर व्यक्त केले.

## वादग्रस्त पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करा

**आक्रमक :** अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यात तसेच शहरात गेल्या काही दिवसांपासून पोलिसांची कारवाई ही मुस्लिम समाजा सोबत दुजाभाव दाखविणारी दिसून येत आहे नुकतेच दिंद्रुड येथे कब्रस्तानात मयत दफन करण्यावरून सुद्धा पोलिसांनी चुकीच्या पद्धतीने प्रकरण हाताळले तसेच समाज बांधवांना विनाकारण त्रास देऊन उचलून ठाण्यात डांबले या सर्व प्रकरणांची उच्च पातळीवर नोंद घेऊन पोलिसांची मनमानी थांबवावी अन्यथा रस्त्यावर उतरून मोठे आंदोलन छेडू असा इशारा मुस्लिम संघर्ष विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष नवीदोद्दिन सिद्दिकी यांनी प्रसिद्धीपत्रकातून दिला आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे की, आधी दफनविधी रोखला. पुन्हा षडयंत्रद्वारे मुस्लिम समाजाला टार्गेट करून मौलवी व धर्मगुरू व माजलगावातले काही वरिष्ठ मान्यवरांवर सह ७० ते ७५ लोकांवर खोटे गुन्हे दाखल केले. युवकांवर अतिरेकी सारखे संशय व्यक्त करून त्यांचे व्हिडिओ चित्र मोबाईल तोंडासमोर लावून वयस्कर व युवकांचा शूटिंग घेतल्या जात आहे. शांततेत संयम राखून शासनाच्या दारी आपल्या हक्कासाठी येणाऱ्या नागरिकांसोबत जर माजलगाव पोलीस प्रशासन असा अतिरेकी सारखा व्यवहार मुस्लिम समाजा सोबत करीत असेल तर जनता खपवून घेणार नाही. यामुळे जनतेमध्ये पोलिसांविरोधात नाराजगी व आक्रोशाचे वातावरण निर्माण झाले आहे व चर्चा होत आहे. कब्रस्तानच्या जागेचे गॅजेट असुन सातबारासह वक्फ बोर्डातही त्याची नोंद आहे. शेकडो वर्षांपासून त्या जागी कब्रस्तान असतांनाही तेथील काही समाजकंटक पुढारी लोक, तहसील आणि पोलीस प्रशासनाने ही कारवाई केली आहे. माजलगाव पोलीस प्रशासन कोणाच्या इशाऱ्यावर मुस्लिम समाजा सोबत छळ करीत आहे? याची चौकशी वरिष्ठ आयुक्ताद्वारे करून संबंधीत पोलीस कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा. अन्यथा रस्त्यावर उतरून मोठे आंदोलन छेडू असा इशारा मुस्लिम संघर्ष विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष नवीदोद्दिन सिद्दिकी यांनी प्रसिद्धीपत्रकातून दिला आहे.

## मतदार यादीत नाव नोंदणी करुन घ्यावी

**भैय्यासाहेब मोरे : निवडणूक आयोगाकडून कार्यक्रम घोषित**

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

केंद्रीय निवडणुक आयोगाकडून दि.२५ जून २०२४ ते २५ जुलै २०२४ दरम्यानच्या कालावधीत मतदान नाव नोंदणी कार्यक्रम जाहीर केला असून सज्ञान नागरिकांनी तात्काळ नाव नोंदणी तसेच मतदार धारकांच्या कार्डची दुरुस्ती करुन घ्यावी असे आवाहन पत्रकाद्वारे मा.नगरसेवक भैय्यासाहेब मोरे यांनी केले आहे.

पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, देशात २०२४ या वर्षी महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड आणि जम्मू काश्मीर येथे विधानसभा निवडणुका होत असून त्या निवडणुकीच्या तसेच महाराष्ट्रात देखील लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या म्हणजे नगरपालिका, महानगर पालिकेच्या निवडणुका होणार आहेत या निवडणुकांमध्ये त्या–त्या भागातील नागरिकांनी मतदारापासून वंचित राहू नये म्हणून केंद्रीय निवडणुक आयोगाकडून दि.२५ जून २०२४ ते २५ जुलै २०२४ दरम्यानच्या कालावधीत मतदान नाव नोंदणी कार्यक्रम जाहीर केला तरी आपले नाव नोंदणीसाठी संपुर्ण नाव, संपुर्ण पत्ता, आधार कार्ड, मोबाईल नंबरसह जावून आपले नाव नोंदणी करुन घ्यावे या करीता १८ वर्षे पुर्ण झालेल्या तरुण–तरुणींनी निवडणुक आयोगाच्या हीींि:/ र्/ीिर्शी.शलळ.सीं.ळप या संकेतस्थळावर जावून प्रत्यक्ष नाव नोंदणी करावी असे आवाहन मा.नगरसेवक भैय्यासाहेब मोरे यांनी केले आहे.

### जन्मदिनांक



**बीड:** सामाजिक चळवळीचे कार्यकर्ते संगमेश्वर आंधळकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना प्रा.विक्रम धन्वे, ड. राजेश शिंदे, ड.तेजस वडमारे,मल्हारी जाधव आदी.

# ईश्वरबाबा भारती पायी दिंडीचे प्रस्थान

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान मठाधिपती प.पु.महंत महादेव भारती व ह.भ.प.शांतीब्रम्हे तुकाराम महाराज भारती यांच्या मार्गदर्शनात बेलगाव येथील श्रीगुरू ईश्वरबाबा भारती पायी दिंडी सोहळा श्रीक्षेत्र पंढरपूर कडे वारक–यांनी टाळ मृदंगाच्या गजरात तल्लीन होत ग्यानबा, तुकाराम गजर करत डोक्यावर तुळशीवृंदावन,हाती दिंड्या पताका घेतलेले वारकरी अशा भक्तिमय वातावरणात आषाढी वारीसाठी दिंडी रवाना झाली. बालाघाटावरील बेलेश्वर संस्थान प्रसिद्ध असुन पायी दिंडी सोहळ्याचे हे दुसरे वर्ष असुन त्याला प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणावर भाविक दिंडीत सहभागी झाले होते.दिंडीमध्ये जवळपास ७०० महिला पुरुष सहभागी झाले होते.आज दि.१० बुधवार रोजी सकाळीच १० वाजता बेलेवर संस्थान येथे दिंडी प्रस्थानावेळी पंचक्रोशीतील भाविक वारकरी जमा झाले होते.



लिंबागणेश येथील ईश्वरभारती मंदिरात अन्नदान आषाढी एकादशीला विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपुरला जाणा–या वारक–यांसाठी लिंबागणेश ग्रामस्थांच्या वतीने गेल्यावर्षी प्रमाणेच ईश्वरभारती मंदिरात महाप्रसादाची सोय करण्यात आली होती.

तत्पुर्वी गावच्या वेशीवर महंतांचे पुष्पहार घालून स्वागत रांगोळी,पायघड्या व सुवासीनींनी औक्षण करुन मंदिरापर्यंत सवाद्य मिरवणूक काढत त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी सरपंच बालासाहेब जाधव,उपसरपंच बाळकृष्ण थोरात, कल्याण वाणी , दामु थोरात, विक्रांत वाणी, विनायक मोरे, पांडुरंग वाणी,अनंत मुळे, बाजीराव दशमे,चोपदार धर्मा थोरात,अजिनाथ वाणी, बाबुराव वाणी, शिवहारी कोटुळे, हरिओम क्षीरसागर, अभिजित गायकवाड, संतोष भोसले,डॉ. गणेश ढवळे आदि उपस्थित होते.

**नियोजन** — मान्यवरांनी कायदा सांगितला सोप्या भाषेत

# बाल लैंगिक अत्याचार कायद्याची जनजागृती

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील संत ॲन्स स्कूल, येथे बांगगल लैंगिक अत्याचार कायदा जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी न्या. जी.जी . सोनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून अशोक तांगडे ,तत्त्वशील कांबळे ,शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर रोशमीन , मिथुन जोगदंड आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या .जी. जी. सोनी यांनी उपस्थीत विद्यार्थ्यांना या कायदयाविषयी माहिती सांगितली बालकांनी आपल्यासोबत अथवा आपल्या मित्र मैत्रिणींसोबत अशी घटना घडल्यास अशा प्रसंगी घाबरून किंवा गोंधळून न जाता आपल्या विश्वासातील व्यक्तीला, पालकांना, शिक्षकांना सांगावे व अशा घटनांपासून सावध रहावे असे मार्गदर्शनपर बोलताना सांगितले. या कार्यक्रमाची प्रस्थावना सेंट ॲन्स स्कूलच्या मुख्याध्यापिका सिस्टर रोस्मीन यांनी केली. अध्यक्ष बालकल्याण समिती, बीड अशोक तांगडे यांनी गूड टच आणि बॅड टच यासंबंधीत माहिती बालकांना समजेल अशा सोप्या भाषेत सांगितली. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना तत्वशील कांबळे म्हणाले की बालविवाह बालमजुरी ,बाल लैंगिक शोषण,भिक्षा मागणारी बालके अशा सर्व समस्येची बालके आपल्याला आढळतात या सर्व बालकांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी व कायद्याचे सजग नागिरक निर्माण करण्याचे कार्य विधी सेवा प्राधीकरणाच्या वतीने केले जाते.



कोणत्याही बालकाला अडचणीच्या वेळी मदत हवी असेल तर मुलांनी १०९८ यां क्रमांकावर फोन करून कळवावे असे आवाहन विधीदूत तत्वशील कांबळे यांनी केले. सदरील कार्यक्रमास विधीदूत मिथून जोगदंड, तसेच सेंट ॲन्य स्कूल मधील शिक्षक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# बीडमध्ये लावले सर्वात उंच होर्डिंग

**आरक्षण :** मनोज जरांगेंची शांतता रॅलीला प्रतिसाद

बीड/पुण्यभ प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांची शांतता रॅली आज बीडमध्ये होत आहे या रॅलीसाठी स्वतः मनोज जरांगे पाटील बीडमध्ये येणार आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्या स्वागतासाठी बीडमध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरांनी बॅनर्स व होर्डिंग लावलेले आहेत असेच बीड येथील मराठा सेवक गंगाधर काळकुटे, मराठा सेवक अशोक रोमन, मराठा सेवक किशोर पिंगळे यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या स्वागतासाठी बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्वात उंच व सर्वात मोठे होर्डिंग लावले आहे हे होर्डिंग येणारा जाणाऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहे त्यामुळे या होर्डिंगची सर्वत्र चर्चा चालू आहे..



दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

## आरोपीला फार्महाऊसमध्ये आश्रय

### ५ जणांवर गुन्हा दाखल




देशोन्नती वृत्तसंकलन

**उल्हासनगर :** हापमर्डर गुन्ह्यातील आरोपी असल्याचे माहिती असूनही फॉर्महाऊसमध्ये लपवून ठेवून राहणे व जेवणाची व्यवस्था करणाऱ्या ५ जणांवर उल्हासनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. याप्रकरणी हापमर्डर गुन्ह्यातील आरोपींना पोलिसांनी अटक केली असून अधिक तपास पोलीस करीत आहेत. उल्हासनगर कॅम्प नं-३, चोपडा कोर्ट परिसरात गेल्या महिन्यात खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी सोहम अनिल पवार, यश सुरेश पवार व धीरज हरीश रोहेरा यांच्यावर उल्हासनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या गुन्हेगारांचा पोलीस शोध घेत असताना तिघेही पुणे जुन्नर येथील एका गावच्या विघनहर्ता ट्रस्ट मालकाने त्याच्या फार्महाऊसमध्ये लपविल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्याठिकाणी त्यांच्या राहणे व जेवणाची व्यवस्था केली होती. गुन्हेगार असल्याचे माहिती असूनही त्यांना पोलिसांपासून लपवून आश्रय दिल्या प्रकरणी ऋतिक उर्फ अटल अनिल शुक्ला, गोपाळ पाटील, सुमित सत्यवान पाटील व गीता खरे यांच्यावर उल्हासनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

## आता कुठे गेली मराठी फिल्म इंडस्ट्री ?

### 'वरळी हिट अँड रन'प्रकरणी संजय राऊतांचा सवाल

**मुंबई :** वरळी हिट अँड रन प्रकरणात दोन दिवसांनी आरोपी मिहीर शाहला विरार येथून अटक करण्यात आली आहे. मिहीर हा शिवसेनेचे उपनेते आणि पालघर जिल्हाप्रमुख राजेश शाह यांचा मुलगा आहे. याप्रकरणी गुन्हे शाखेच्या पथकाने मिहीरची आई आणि दोन मोठ्या बहिणींनाही ताब्यात घेतले आहे. दरम्यान, या प्रकरणी विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला जात आहे. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी यावर भाष्य करताना, सरकारकडून आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. मिहीरने वरळी कोळीवाड्यात राहणाऱ्या कावेरी नाखवा नावाच्या महिलेला रविवारी (दि.७) सकाळी ५.२५ वाजता त्याच्या आलिशान कारने उडवले आणि सुमारे दोन किलोमीटर फरफटत नेले. या घटनेत कावेरी यांचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, अभिनेते जयवंत वाडकर त्या महिलेचे सख्ये काका आहेत. मराठी इंडस्ट्रीतील सहकलाकाराच्या जवळच्या नातेवाईकाचा अशा पद्धतीने मृत्यू होतो, पण इंडस्ट्रीतून कुणी याबाबत काही बोलत नाही, अशी टीका संजय राऊत यांनी केली आहे.



**काय म्हणाले संजय राऊत?**

याबाबत माध्यमांशी बोलताना संजय राऊत म्हणतात, 'राज्यातले सरकार गुन्हेगारांना पाठिशी घालत आहे. वरळी हिट अँड रन प्रकरणात हेच झाले. या मुलाला फाशीची शिक्षा देण्याची मागणी मुंबई पोलिसांनी केली पाहिजे. हिट अँड रन प्रकरणात ज्या महिलेचा मृत्यू झाला, त्या मराठी अभिनेते जयवंत वाडकर यांच्या नातेवाईक आहेत. आता कुठे गेली मराठी इंडस्ट्री? एरव्ही आपले कमेंट्स देत असतात. त्यांनी यावर बोलले पाहिजे. कसला टाळकुटेपणा ही मराठी इंडस्ट्री करतेय? आपल्या मराठी इंडस्ट्रीतील एका सहकाऱ्याचे नातेवाईक अशाप्रकारे रस्त्यावर चिरडले गेले आहेत .

## ..तर सरकारमधून बाहेर पडा

### ▌अन्यथा आरक्षण प्रश्न सोडवा
### ▌विजय वडेट्टीवारांचे महायुतीला आव्हान



देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई :** मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून राज्यातील राजकारण अधिकच तापताना दिसत आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन केले होते. परंतु, विरोधकांनी या सर्वपक्षीय बैठकीवर बहिष्कार घातला. यानंतर ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून सह्याद्री अतिथीगृहात बैठक घेण्यात आली. ओबीसी आणि मराठा आरक्षणावरून विधानसभा आणि विधान परिषद या दोन्ही सभागृहांमध्ये सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली. यातच आरक्षणाचा प्रश्न सोडवता येत नसेल तर सरकारमधून बाहेर पडा, असे आव्हान काँग्रेसचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दिले.

पत्रकारांशी बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, महायुतीचे पितळ उघडे पडेल, या भीतीने महाविकास आघाडीच्या नेत्यांना बोलू दिले जात नाही. अपयश लपवण्यासाठी सरकारचा हा थयथयाट सुरू आहे. महायुतीत २०० च्यावर आमदार आहेत. तरी आरक्षणाचा प्रश्न महायुती सरकार सोडवत नाही. उलट सभागृहात गोंधळ घालून कामकाज बंद पाडले जात आहे. विरोधी पक्षाला सभागृहात बोलू दिले जात नाही, असा आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला. दरम्यान, सरकारने आंदोलकांना काय आश्वासन दिले, हे महाविकास आघाडीच्या नेत्यांना सांगितले नाही. मुख्यमंत्री अधिवेशन सुरू असताना आरक्षणप्रश्नी बैठक बोलावतात. त्यापेक्षा त्यांनी भ्रष्टाचार आणि घोटाळ्यांना आम्ही वाचा फोडत आहोत.

### सरकारची इच्छाशक्ती नाही

मराठा आणि ओबीसी समाजात महायुतीने तेढ निर्माण केले आहे. आरक्षणाचा प्रश्न या सरकारला सोडवायचा नाही. हे आता स्पष्ट झाले आहे. सरकारने सभागृहात भूमिका स्पष्ट करणे अपेक्षित आहे. त्यामुळे जनतेला आरक्षणाबाबतची माहिती मिळू शकते. परंतु सरकारला जनतेला अंधारात ठेवायचे आहे. म्हणून आरक्षण प्रश्नावर सरकार सभागृहात बोलत नाही. खरे तर आरक्षणाचा प्रश्न सोडविण्याची या सरकारची इच्छाशक्ती नाही. त्यामुळे महायुतीने सत्तेतून बाहेर पडावे, अशा शब्दांत विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर हल्लाबोल केला.

## डोक्यात घुसलेल्या कोयत्यासह जखमी रुग्णालयात

### प्रकृती चिंताजनक

देशोन्नती वृत्तसंकलन

**कोल्हापूर :** करनूर (ता. कागल) येथे गुलाब बाबालाल शेख (६०) रा. करनूर यांच्यावर सोमवारी (दि. ८) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास अज्ञाताने कोयत्याने हल्ला केला. यावेळी डोक्यात घुसलेल्या कोयत्यासह शेख यांना बेशुद्धावस्थेत नातेवाईकांनी कोल्हापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले.



डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करून कोयता काढला असून, शेख यांची प्रकृती चिंताजनक आहे.

करनूर येथील गुलाब शेख हे शेतकरी आहेत. सोमवारी सायंकाळी सव्वासहाच्या सुमारास गावात स्मशानभूमीजवळ ते गंभीर जखमी अवस्थेत रस्त्यात पडलेले आढळले. काही ग्रामस्थांनी याची माहिती शेख यांच्या कुटुंबीयांना दिली. यानंतर तातडीने शेख यांचा मुलगा घटनास्थळी पोहोचला. शेख यांच्या डोक्यात धारदार कोयता अडकला होता. दोन्ही हातांवर कोयत्याने वार झाले होते.



**सोलापूर :** यंदा वारीचे सलग ५५ वर्ष पूर्ण करणाऱ्या गजानन महाराज पालखी दिंडीचे बुधवारी सकाळी रूपाभवानी चौकात आगमन झाले. यावेळी स्वागताला खा. प्रणिती शिंदे, आ. विजयकुमार देशमुख, पोलिस आयुक्त एम. राजकुमार, उपायुक्त विजय कबाडे, उपायुक्त दीपाली काळे, मनपा उपयुक्त मच्छिंद्र घोलप, उपायुक्त आशिष लोकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## वाहतुकीच्या खेळखंडोब्याला सरकारच जबाबदार

### पुणे काँग्रेसचे थेट मुख्यमंत्री शिंदेंना पत्र

देशोन्नती वृत्तसंकलन

**पुणे:** शहरातील वाहतुकीच्या खेळखंडोब्याला सरकारच जबाबदार आहे. शहरांतर्गत प्रवासासाठी पुणेकरांचा श्वास असलेल्या पीएमपीएलच्या व्यवस्थापकपदाच्या सातत्याने बदल्या करून सरकार सार्वजनिक सेवेबाबत आपण गंभीर नाही हेच दाखवून देत असल्याची टीका काँग्रेसने केली.

प्रदेश उपाध्यक्ष, माजी आमदार मोहन जोशी यांनी याबाबत थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाच पत्र लिहिले आहे.

एकाही व्यवस्थापकीय संचालकाला सरकार कार्यकाल पूर्ण करू देत नाही. शहरातील सार्वजनिक प्रवासी सेवेसाठी एकमेव असलेल्या या कंपनीचे



कामकाज कार्यक्षम व्हावे, असे सरकारला वाटतच नाही. खंबीर, कणखर व्यवस्थापकीय संचालक असेल, त्याला पूर्ण कार्यकाळ मिळेल तर तो काहीतरी करेल. मात्र, सरकार कायमच या पदावरील नियुक्तीबाबत धरसोडपणा करत आहे, असे जोशी यांनी पत्रात म्हटले आहे.

पीएमपीच्या ताफ्यात २ हजार बसगाड्यांची भर घातली जाईल, असे पालकमंत्री अजित पवार यांनी वर्षभरापूर्वी जाहीर केले. मात्र, त्या दृष्टीने काहीही कार्यवाही झालेली दिसत नाही. अनेक बस मार्गांवर प्रवाशांना बसची वाट पाहात तासन्तास ताटकळत उभे राहावे लागते. बसशेड्सही अपुऱ्या आहेत. शहराची वस्ती वाढली त्या कारणाने मार्गांची फेररचना करायला हवी आणि त्यासाठी सक्षम प्रमुख अधिकारी प्रदीर्घ काळ तिथे असायला हवा. मात्र, त्याकडे लक्ष देण्याऐवजी महायुती सरकार बेजबाबदारपणे वागून पीएमपीच्या कारभाराचा खेळ खंडोबा करत आहे, असा आरोप मोहन जोशी यांनी केला आहे. कंपनीच्या प्रमुख पदांवरील व्यक्तीला किमान तीन वर्षे तरी बदलू नये, अशी मागणी जोशी यांनी पत्रात केली आहे.

## शासनाने सगेसोयरेचा जीआर काढला तर मुंबई जाम करू!

### लक्ष्मण हाकेंचा इशारा

देशोन्नती वृत्तसंकलन


**मुंबई :** मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून राज्यातील राजकारण अधिकच तापताना दिसत आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन केले होते. परंतु, विरोधकांनी या सर्वपक्षीय बैठकीवर बहिष्कार घातला. यानंतर ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून सह्याद्री अतिथीगृहात बैठक घेण्यात आली. यानंतर ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून आंदोलन करणारे लक्ष्मण हाके यांनी आक्रमक होत मुंबई जाम करण्याचा इशारा दिला. सर्वपक्षीय बैठकीला विरोधकांनी उपस्थित राहणे आवश्यक होते.



ओबीसींसंदर्भातील ठाम भूमिका मांडायला हवी होती. दहा दिवस उपोषण केल्यानंतर शासनाने आम्हाला लेखी आश्वासन दिले आहे. पक्षांचे नेते ओबीसी आरक्षणाला धक्का लागू देणार असल्याचे सांगत आहे. परंतु, शासनाने सगेसोयरेंचा अध्यादेश आणण्याची तयारी सुरू केल्याची माहिती आम्हाला मिळत आहे. या अध्यादेशात नेमके काय म्हटले आहे. मग ओबीसींचे आरक्षण संपणार आहे का, याची माहिती घ्यावी लागणार आहे. एक कार्यकर्ता म्हणून जबाबदारीने सांगतो की, सगेसोयरेंचा अध्यादेश आला, तर ओबीसींचे आरक्षण संपवणे हा या शासनाचा हेतू असू शकतो. बोगस कुणबी नोंदींमुळे ओबीसी आरक्षण संपवण्याचा प्रयत्न सुरू आहे, अशी टीका लक्ष्मण हाके यांनी केली. बोगस कुणबी नोंदी असतील किंवा सगेसोयरेंचा अध्यादेश असेल, बारा बलुतेदार, अठरा बलुतेदार, भटके विमुक्त यांसह जे २९ टक्के आरक्षण आहे, ते संपवण्याचा घाट इथल्या शासनाने घातलेला आहे. याला आमचा विरोध आहे. हा अध्यादेश आला, तर आम्ही आंदोलनाची पुढील दिशा ठरवू. मुंबईत जाम करू. आम्ही शासन काय करते, याची वाट पाहत आहोत. शासनाने आम्हाला विश्वासात घ्यावे.

## घरी टीव्ही पाहत असताना आजीसमोर अचानक उभा राहिला बिबट्या

### प्रतिकार करत स्वतःला वाचवले



देशोन्नती वृत्तसंकलन

**मंचर/ पुणे :** आंबेगाव तालुक्यातील कळंब व लौकी हद्दीवर असलेल्या सुंभेमळ्यात लक्ष्मीबाई खंडू थोरात (७०) या घरी टीव्ही पाहत होत्या. त्यावेळी घरात अचानकपणे बिबट्याने प्रवेश केला. घडलेल्या घटनेने घाबरून न जाता आजीने मोठ्या धैर्याने प्रतिकार केल्यामुळे स्वतःला वाचविण्यात त्यांना यश आले. बिबटे अगदी घरात येऊ लागल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

लक्ष्मीबाई थोरात या गेल्या वर्षभरापासून सुंभेमळा येथे एकट्या राहतात. घराचा दरवाजा उघडा ठेवून लक्ष्मीबाई नेहमीप्रमाणे रात्री घरात एकट्या टीव्ही पाहत होत्या. आठ वाजण्याच्या सुमारास बिबट्याने घरात प्रवेश केला. कशाचातरी आवाज आल्याने आजी समोर पाहतात तर दोन फुटांच्या अंतरावर बिबट्या. अनाहूतपणे घडलेल्या घटनेमुळे पूर्णपणे गोंधळून न जाता क्षणाचाही विलंब न करता धैर्याने प्रतिकार करून त्यांनी मोठ्याने आरडाओरड केला. त्यानंतर बिबट्याने पोबारा केला होता. लक्ष्मण मारुती थोरात, अथर्व बळी थोरात, मोहन बबन थोरात, भरत लक्ष्मण थोरात आदी परिसरातील नागरिक मदतीसाठी धावून आले. त्यांनी बॅटरीच्या प्रकाशात बिबट्या दत्तात्रेय राजाराम थोरात यांच्या उसाच्या शेतात निघून जाताना पाहिले. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

लौकी, कळंब, चांडोली बुद्रुक आदी गावांत बिबट्यांनी शेळ्या, मेंढ्या, बैल व वासरांचा फडशा पाडला आहे. कळंब येथील सुंभेमळ्यात अगदी घरात येऊन बिबटे हल्ले करू लागले आहेत.

## रत्नागिरी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी ४७७ नवी पदे

### पालकमंत्री उदय सामंत यांनी दिली माहिती

**रत्नागिरी :** येथील ४३० खाटांच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी ५०९ पदे वर्ष निहाय टप्प्याटप्प्याने निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली. शिवाय ४७७ मनुष्यबळ सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता मिळाली आहे, अशी माहिती पालकमंत्री उदय सामंत यांनी दिली. त्यामुळे या महाविद्यालयाचे कामकाज आता अधिक सुरळीत चालेल. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे उप सचिव शंकर जाधव यांच्या स्वाक्षरीने सोमवारी या संदर्भातील शासण निर्णय प्रसिद्ध करण्यात आला. या शासन निर्णयात म्हटले आहे की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रत्नागिरी येथे सुरू करण्यात आलेल्या ४३० खाटांच्या रुग्णालयाकरिता गट-अ ते गट-क मधील नियमित ५०९ पदे वर्षनिहाय टप्प्याटप्प्याने निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

## इचलकरंजीला स्वतंत्र तालुका घोषित करा

### आ.प्रकाश आवाडे यांची मागणी

**इचलकरंजी/कोल्हापूर :** शहर परिसरातील औद्योगिकीकरण वाढत असल्याने इचलकरंजीत स्वतंत्र तहसील कार्यालयाची गरज आहे. त्यामुळे स्वतंत्र तालुका जाहीर करावा, अशी मागणी आमदार प्रकाश आवाडे यांनी मंगळवारी पावसाळी अधिवेशनात केली.

तसेच कबनूरला नगर परिषद करा, इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयात एमआरआय मशीन आणि आवश्यक कर्मचारी तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणीही केली. मतदारसंघातील प्रलंबित विषयांवर अधिवेशनात चर्चा करताना आवाडे यांनी प्रमुख मागण्या केल्या. त्यामध्ये, सन १९८५ पासून सातत्याने इचलकरंजी स्वतंत्र तालुका जाहीर करावा, अशी मागणी केली जात आहे. त्याचा प्राधान्याने विचार करून तालुका जाहीर करावा. शहरालगत ७० हजार लोकसंख्या असलेल्या कबनूरला नगर परिषद करण्याची मागणी आहे. कायद्यानुसार ५० हजार लोकसंख्येला नगर परिषद करावी, अशा सूचना असताना हा प्रश्न प्रलंबित आहे. त्याची मंजुरी देऊन अंमलबजावणी करावी.

## 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे फॉर्म भरून घेताना अंगणवाडी सेविकेचे निधन

**मोहोळ / सोलापूर :** तालुक्यातील देगाव (वा) येथील अंगणवाडी क्रमांक-१ च्या सेविकेचे शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचे फॉर्म भरण्याचे काम करत असताना अंगणवाडीतच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. आज (बुधवार) सकाळी ११ वाजता ही घटना घडली. सौ. सुरेखा रमेश आतकरे (४८) असे त्यांचे नाव आहे.

कामावरतीच हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाल्याने गावावर शोककळा पसरली आहे. त्या अत्यंत सृजनशील आणि शांत स्वभावाच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. शासनाकडून या निराधार झालेल्या कुटूंबाला आर्थिक मदत मिळावी अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

## सहकारी तत्त्वावर जोतिबासह २३ गावांचाही विकास

### प्राधिकरणची संकल्पना

देशोन्नती वृत्तसंकलन

**कोल्हापूर:** भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या जोतिबा देवस्थानच्या महात्म्याच्या माध्यमातून जोतिबा डोंगर आणि परिसरातील २३ गावांच्या विकासाचा हा आराखडा तयार करण्यात आला आहे. सहकारी तत्त्वावर जोतिबा प्राधिकरणाचा पूर्ण विकास अशीही यामध्ये संकल्पना असून, याव्दारे परिसरातील २३ गावांचा चौफेर विकास होईल, असे मनमोहक चित्र या आराखड्यातून तयार करण्यात आले आहे. व्यावसायिकदृष्ट्या जोतिबा ब्रॅण्डची निर्मिती हादेखील यातील एक घटक आहे. जोतिबा डोंगरावर वाढत्या भाविकांच्या संख्येमुळे तेथील पायाभूत सोयी सुविधांवर सध्या ताण येत आहे. आपत्कालीन व्यवस्थेवरही हा ताण येत असून, यामुळे नागरिक, भाविकांना दर्जेदार सोयी, सुविधा देण्यावर मर्यादा येत आहेत.



**रत्नागिरी :** महाराष्ट्रामध्ये काजू पिकाखालील क्षेत्र सुमारे १.९१ लाख हेक्टर असून त्यापासून सुमारे १.८१ लाख मे.टन उत्पादन मिळते. विशेष म्हणजे देशामध्ये महाराष्ट्राची काजू उत्पादकता सर्वात जास्त म्हणजे ९८२ किलो/हेक्टर आहे. महाराष्ट्रात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, कोल्हापूर व पालघर या जिल्ह्यांमध्ये काजूचे पीक प्रामुख्याने घेतले जाते.

## पुणे जिल्ह्यातील 317 गावांत स्मशानभूमी नाही

देशोन्नती वृत्तसंकलन

**पुणे :** जिल्ह्यातील ३१७ गावांमध्ये अजूनही स्मशानभूमी नाही. या गावांमध्ये सध्या अंत्यसंस्कार करण्यासाठी नागरिकांना इतर जागांचा आधार घ्यावा लागत आहे. गावकऱ्यांकडून सतत स्मशानभूमीची मागणीदेखील करण्यात येत आहे. जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाने ३१७ गावांमध्ये स्मशानभूमीच्या निधीसाठी जिल्हा नियोजन समितीकडे (डीपीसी) प्रस्ताव पाठवल्याची माहिती ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विजयसिंह नलवडे यांनी दिली.

## खंडपीठासाठी लोकप्रतिनिधींमार्फत पुन्हा पाठपुरावा करणार

### सांगलीत वकील संघटनेची बैठक

देशोन्नती वृत्तसंकलन

**सांगली :** कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे, यासाठी कृती समितीने आंदोलन सुरू असून सांगली वकील संघटनाही यामध्ये अग्रेसर राहील. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींमार्फत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा केला जाईल.

तसेच टप्प्याटप्प्याने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सांगली वकील संघटनेने दिला आहे.

वकील संघटनेचे अध्यक्ष किरण रजपूत यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीस उपाध्यक्ष ॲड. अमोल पाटील, ॲड. विशाल कुंभार, ॲड. प्रमोद सुतार, ॲड. दीपक हजारे, ॲड. रत्नेश जोशी आदी उपस्थित होते. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींमार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करून खंडपीठ सुरू करावे, अशी विनंती केली जाईल. खंडपीठाच्या मागणीसाठी ज्येष्ठ वकिलांच्या मार्गदर्शनाखाली विविध आंदोलनांची जिल्हाभर व्याप्ती वाढविण्याचे बैठकीत ठरले.

कोल्हापूर येथे खंडपीठ सुरू करण्याच्या मागणीसाठी गेली ३८ वर्षे पाठपुरावा केला जात आहे. या आंदोलनाची शासनाने थोडी दखल घेतली आहे. खंडपीठाची स्थापना अंतिम टप्प्यात आली आहे. दि. ७ सप्टेंबर २०१५ रोजी तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती मोहित शहा यांनी कोल्हापूर येथे खंडपीठ मंजूर करत असल्याचा अहवाल दिला होता.

## भात लागवड खोळंबली

देशोन्नती वृत्तसंकलन


**नाशिक :** नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात गेल्या पंधरवड्यात पावसाने दडी मारल्याने खरीप पेरणीला वेग आला आहे. चालू खरीप हंगामात जिल्ह्यात ६.४१ लाख हेक्टरवर खरीप पेरणीचा अंदाज कृषी विभागाने वर्तविला आहे. त्यापैकी ४.३९ लाख हेक्टरवर पेरणी पूर्ण झाली आहे, जी एकूण खरीप क्षेत्राच्या ६८ टक्के आहे. मात्र आता पावसाने ओढ दिल्यामुळे अनेक भागातील शेती कामे खोळंबली आहेत. नाशिक जिल्ह्यात प्रामुख्याने मका, सोयाबीन, मूग, तूर, कापूस, बाजरी, उडीद आणि भात ही खरीप पिके घेतली जातात. एकूण खरीप पेरणीच्या क्षेत्रामध्ये मक्याची ३५ टक्के एकरी वाटा आहे, तर बाजरी आणि धानाचा वाटा अनुक्रमे १७.३७ टक्के आणि १४.६१ टक्के आहे. नाशिक जिल्ह्यातील मका हे प्रमुख पीक आहे. राज्याच्या कृषी विभागाने २.१७ लाख हेक्टरवर पेरणीचा अंदाज व्यक्त केला होता, तर २.२० लाख हेक्टरवर मक्याची पेरणी पूर्ण झाली आहे. जी अंदाजित क्षेत्रापेक्षा जास्त आहे. कृषी विभागाने १.११ लाख हेक्टरवर बाजरीच्या पेरणीचा अंदाज व्यक्त केला होता.

चांदवड, मालेगाव, निफाड, नांदगाव, देवळा आणि बागलाण या सहा तालुक्यांमध्ये ८० टक्के पेरणी पूर्ण झाली आहे. जिल्ह्यातील चार तालुक्यांमध्ये अद्याप पेरण्या उरकलेल्या नाहीत. सुरगाणा, त्र्यंबकेश्वर, पेठ, इगतपुरी आणि नाशिक या पाच तालुक्यांत खरिपाच्या पेरण्या १५ टक्क्यांपेक्षा कमी झाल्या आहेत.

### पावसाने दिली ओढ

नाशिक जिल्ह्यातील पश्चिम पट्ट्यात भात लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. यंदा पेरण्या होऊन अनेक दिवस उलटले असताना केवळ पावसाअभावी भात लागवडी खोळंबल्या आहेत. इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, पेठ, सुरगाणा आदी भागात काही अंशी भात लागवड सुरु असून अद्यापही भात उत्पादक शेतकऱ्यांना दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. त्यानंतर भात लागवडीला वेग येणार आहे.

### नाशिक जिल्ह्यात ६८ टक्के पेरणी



# रोजगार हमी योजनेत टाकला डाका!

परळीतील बेलंब्यात लाखो रुपयांचा अपहार • विहीर न खोदता लाटला लाखोंचा मलिदा • भ्रष्ट लोकांना निलंबित करण्याचे दिले आदेश • योजना चांगली पण राबविणारे हात भ्रष्टाचाराची

परळी/पुण्यभ प्रतिनिधी

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत बेलंबा येथे विहीर न खोदता विहिरीसाठी असलेले मस्टर स्वरूपातील १ लाख १२ हजार दोनशे तीन रुपये मजुरांच्या नावे रोजगार हमी कायदा व शासन निर्णय डावलुन देण्यात आले होते. शासन निधीचा दुरुपयोग करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी परळी पंचायत समितीतील तांत्रिक अधिकारी ए ए पोलशेटवार, ऑपरेटर एस एस पिटलेवाड, ग्रामरोजगार सेवक सुरेश बलभीम गित्ते यांना शासकीय सेवेतून निलंबित करावे असा आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना दि. ९ जुलै २०२४ रोजी पारित केला असल्याची माहिती तक्रारदार वंचित बहुजन आघाडीचे युवा महासचिव ज्ञानेश्वर जीवन गित्ते यांनी पत्रकार परिषदेत दिली. दरम्यान सदरील प्रकरणामुळे परळी तालुक्यात एकच खळबळ उडाली असून अनेक गावातील न खोदता पैसे उचललेल्या सिंचन विहिरींची प्रकरणे या निमित्ताने बाहेर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजनेअंतर्गत बेलंबा येथील पांडुरंग खंडू सरवदे यांना सिंचन विहिर मंजूर करण्यात आली होती. सदरील विहीर न खोदता विहिरीसाठी असलेले मस्टर पूर्ण करून रोजगार हमी कायद्याची पायमल्ली करण्यात आली. शासन निधीचा दुरुपयोग करून शासनाची फसवणूक



**यांनी घेतली पत्रकार परिषद:** पत्रकार परिषदेस वंचित बहुजन आघाडीचे युवा महासचिव ज्ञानेश्वर गित्ते, युवक आघाडी तालुकाध्यक्ष राजेश सरवदे, परळी शहराध्यक्ष गफारशहा खान, प्रसिध्दी प्रमुख बालासाहेब जगतकर , युवा ता. उपाध्यक्ष अवि मुंडे,संतोष वाव्हळे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### मान्यता दिलेली नसतानाही वर्क ऑर्डर

अनुषंगाने संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासाही मागितला होता. प्रशासकीय मान्यता दिलेली नसतानाही संबंधितांनी वर्क ऑर्डर जनरेट करणे, मागणी नसतानाही मस्टर काढणे, मोजमाप पुस्तिका व मस्टर नसतानाही पांडुरंग खंडू सरवदे यांची विहिरीचे काम न होताच मस्टर काढून शासकीय रक्कम १ लाख १२ हजार २०३ रुपयांचा अपहार केला होता. याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी शासन परिपत्रक दि. २५ ऑगस्ट २०२१ व दि ११ नोव्हेंबर २०२० मधील तरतुदीनुसार संबंधितांच्या सेवा आपल्या स्तरावर कमी करण्यात येऊन तसा अहवाल कार्यालयास सादर करावा असे पत्र गटविकास अधिकारी पंचायत समिती यांना काढले आहे.

## रिपाइंच्या मध्यस्थितीने उपोषण सोडले!

सामंजस्य : अवैध मुरुम उत्खनन संदर्भात उपोषण



राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील ताहाराबाद येथील गट क्रमांक ५३ मधील झालेल्या अवैध उत्खन् ना बाबत कारवाई होणेसाठी मागील १०दिवसापासून चालू असलेले उपोषण आर.पी.आय. ( आठवले गट) च्या मध्यथीने स्थगित करण्यात आले.उपोषणकर्त्या महिला मंगल विनायक विधाते तहसील कार्यालया समोर ताहाराबाद येथील गट क्रमांक ५३ मध्ये झालेल्या उत्खनन कारवाई साठी बसल्या होत्या ,प्रशासकीय स्तरावर तलाठी ताहाराबाद याने त्या क्षेत्रा मधील झालेल्या मुरून उत्खनंन् चा ५०ब्रासचा पंचनामा अहवाल तहसीलदार यांना सादर केला ,परंतु उपोषण कर्त्यांच्या म्हणण्या नुसार झालेले उत्खनन ६०० ते ७०० ब्रास अंदाजे आहे ,तहसीलदार यांनी ५० ब्रास मुरूम् उत्खनन नोटीस ही उपोषण कर्त्याला मान्य नसल्या मुळे उपोषण सोडविण्या करिता प्रशासनाला तांत्रिक अडचणी निर्माण होत होत्या ३ ते४ वेळा तहसीलदार यांनी उपोषण सोडविण्यासाठी प्रयत्न केले ,परंतु त्यामध्ये मार्ग निघू शकला नाही,अखेर आर.पी आय उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष प्रविण भाऊ लोखंडे ,आर.पी .आय तालुका अध्यक्ष विलास नाना साळवे ,नवीन साळवे,

आर.पी .आय.कार्यकर्त्यांच्या मध्यस्थीने एका गरीब शेतकरी महिलेला अखेर न्याय मिळाला उपोषण सोडिवताना उपोषणार्थी यांनी आर.पी .आय कार्यकर्त्याचे व तहसीलदार नामदेव पाटील यांचे आभार मानले यावेळी उपोषणाथीना आपले अश्रू अनावर झाले.

## बीडीओंच्या रुबाबात जनता झाली हैराण!

चर्चा : अशाने जनतेची कामे कशी होतील?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज पंचायत समितीच्या बीडीओ मॅडमचा मनमानी कारभार सुरू आहे त्यांना पंचायत समिती केज अधिकारी असल्या सारखे वाटते का केज पंचायत समिती त्यांचे घर वाटत आहे असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे कारण केज पंचायत समितीच्या बीडीओ मॅडम त्यांच्या वेळेनुसार पंचायत समिती मध्ये येतात आणी जातात तर कधी पंचायत समिती कडे तोंड सुध्दा दाखवत नाही.तसेच केज पंचायत समितीच्या बीडीओ अंबाजोगाई वरुन उंटावर बसून कारभार हाकत आहेत असे सुध्दा नागरिकांन मध्ये चर्चा सत्र सुरू झाले आहे.कारण बीडीओ मॅडमची एखाद्या कामाच्या इस्टीमेंट वर इतर काही कामा निमित्त सह



केज पंचायत समितीच्या बीडीओ यांना काही कामानिमित्त संपर्क केला संपर्क घेत नाहीत काही वेळा कलेक्टर फोन घेतील पण केज पंचायत समितीच्या बीडीओ मॅडम फोन घेणार नाहीत. मग कलेक्टर पेक्षा बीडीओ मॅडम मोठ्या झाल्या का काय असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

## आभासी तंत्रज्ञानने लावली शिक्षणाची गोडी

: कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर केल्यास अध्ययन परिणामकारक होते, याचाच आधार घेऊन कडा येथील मोतीलाल कोठारी विद्यालयातील तंत्रस्नेही शिक्षक मनोज सातपुते यांनी शिकविण्यासाठी एआरव्हीआर आभासी तंत्रज्ञान ( अग्युमेंटेड रिऍलिटी आणि व्हरच्युअल रिऍलिटी ) चा वापर केल्याने विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी निर्माण होत आहे.

आभासी तंत्रज्ञान ( अग्युमेंटेड रिऍलिटी आणि व्हरच्युअल रिऍलिटी ) हे नवीन तंत्रज्ञान असून शहरी भागात शिक्षणासाठी वापर केला जात आहे. या माध्यमातून



विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या जटील संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होत आहे.

शिक्षक मनोज सातपुते यांनी ही संकल्पना राबविण्यास सुरुवात केली आहे. या द्वारे मुलांना ३ऊ चष्म्याच्या सहाय्याने चांद्रयान ३ सारख्या संकल्पना, मानवी मेंदू तसेच भाषिक कौशल्य विकसित करण्यासाठी या

## पुलाचे काम गतीने पूर्णत्वास जाईल!

नियोजन : डॉ.योगेश क्षीरसागरांकडून कामाची पाहणी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड ते परळी महामार्गावरील घोडका राजुरी परिसरात (ता.बीड) तलावाजवळ पुलाचे बांधकाम सुरु आहे. या रस्त्याच्या कामासह पुलाची पाहणी राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.९) केली.

पावसात पर्यायी रस्ता वाहून जाऊ शकतो, त्यामुळे पुलाचे बांधकाम गतीने पूर्ण करावे, अशा सूचना त्यांनी संबंधित कंपनीला दिल्या. त्यानंतर पुलाचे बांधकाम प्राधान्याने पूर्ण करून देण्याची ग्वाही राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अभियंत्यांसह कंपनीच्या व्यवस्थापकांनी दिली आहे. पहिल्याच पावसात पर्यायी पुल वाहून गेल्याचे प्रकार जिल्ह्यात काही ठिकाणी समोर आले आहेत. याच पार्श्वभूमीवर डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड तालुक्यातील घोडका राजुरी परिसरातील



## महाराष्ट्र आयडॉल पुरस्काराने सन्मानित!

अभिनंदनिय : सरपंच जनाबाई काकडेंना बहुमान

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

महिला सरपंच जनाबाई काकडे यांना महाराष्ट्र आयडॉल पुरस्कार केज तालुक्यातील साबला येथील सरपंच जनाबाई नरहरी काकडे यांची महाराष्ट्र आयडॉल पुरस्कार २०२४ साठी निवड झाली असून लवकरच भव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती पुणे येथील राजर्षी शाहू प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष भगवान रामचंद्र श्रीमंदिलकर यांनी दिली आहे. राजर्षी शाहू प्रतिष्ठान, दक्ष मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य जागृत शोध वृत्तपत्र यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त राजर्षी शाहू आदर्श सरपंच पुरस्कार २०२४ चे आयोजन केलेले आहे. यासाठी विभागातील ५० उत्कृष्ट काम करणाऱ्या सरपंच मान्यवरांना सन्मानित करण्यात येणार आहे. दरम्यान, उत्कृष्ट काम करणाऱ्या महिला सरपंचांमध्ये जनाबाई काकडे यांची वर्णी लागली असून सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.



## प्रतिभावंत कलावंतांचे ऊर्जा केंद्र

नंदू वाघमारे:सहावा वर्धापन दिन थाटात

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

आयुष कला अकादमी प्रतिभावंत कलावंतांचे ऊर्जा केंद्र असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय नाटय विद्यालय(छडऊ)प्रवेशित रंगकर्मी नंदू वाघमारे यांनी केले. ते आयुष अकॅडमी ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स च्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सत्कार सोहळ्यात बोलत होते. आयुष अकॅडमी ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सचे संचालक हरीदास घुंगासे हे ग्रामीण भागातील कलावंत घडविण्यासाठी कार्यरत आहेत. त्यांना सह संचालकअभिनेता रघुनाथ ताठे यांचे सहकार्य लाभले आहे. प्रख्यात लेखक-दिग्दर्शक प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या पाच वर्षांत अकादमी तर्फे विविध सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्य नाटय स्पर्धेह देशभरातील विविध नाटय स्पर्धेत यश संपादित केले आहे.

रंगकर्मी सन्मित्र नंदू वाघमारे यांची नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा दिल्ली मध्ये निवड झाली आहे. जगातील सर्वोत्कृष्ट थिएटर स्कूलपैकी एक आहे. मराठवाडयात बोटावर मोजता येईल एवढेच विद्यार्थी इथपर्यंत पोहोचले आहेत.त्या



## भारतानं जगाला बुद्ध दिला, युद्ध नव्हे

दौरा : पंतप्रधान मोदींचा व्हिएन्नातील भारतीयांशी संवाद

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या ऑस्ट्रियाच्या दौऱ्यावर आहेत. याआधी त्यांनी रशिया दौऱ्यादरम्यान व्लादीमीर पुतिन आणि इतर उच्चपदस्थांशी चर्चा केली. या भेटीदरम्यान दोन्ही देशांमधील संबंध वृद्धिंगत करण्यासंदर्भात सहमती झाल्याचंही दिसून आलं. त्यानंतर सध्या पंतप्रधान नरेंद्र मोदी व्हिएन्नामध्ये असून तिथल्या भारतीयांशी त्यांनी बुधवारी संवाद साधला. यावेळी भारतानं जगाला युद्ध नव्हे, तर बुद्ध दिला, असं मोदी म्हणाले.भारत आता जागतिक नेतृत्वासाठी इच्छुक असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले. भारत सध्या सर्वोत्तम होण्याचा, सर्वाधिक यश मिळवण्याचा आणि सर्वोच्च यश गाठण्याचा



### भारत आणि ऑस्ट्रियामधील साम्य

भारत आणि ऑस्ट्रिया भौगोलिकदृष्ट्या दोन टोकाच्या ठिकाणी आहेत. पण आपल्यामध्ये अनेक साम्यदेखील आहेत. दोन्ही देशांना लोकशाही बांधून ठेवते. स्वातंत्र्य, समता, विविधता आणि कायद्याचा सन्मान ही मूल्य दोन्ही देशांसाठी समान महत्त्वाची आहेत. आपले समाज बहुसांस्कृतिक आणि बहुभाषिक आहेत.

धोरण | जिल्हा प्रशासन लागले नियोजनाला

# १३५० गावात राबणार अनोखी मोहीम!

बीड/प्रतिनिधी पुण्यभूमी

जिल्ह्यातील १३५० गावांमध्ये गृहभेटीच्या माध्यमातून अतिसार थांबवा व स्वच्छतेचे दोन रंग ओला हिरवा सुका निळा. या उपक्रमात कुजणारा व नको देणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी प्रत्येक गावामधून पाच संवादक या प्रमाणे जवळपास ६००० संवादकांच्या माध्यमातून जनजागृती करणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिली आहे. जिल्हा परिषद सभागृहात ग्रीन लीफ पडताळणी बैठक व अतिसार थांबवा अभियान तसेच स्वच्छतेचे दोन रंग या जनजागृती उपक्रम शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संगितादेवी पाटील, उपविभागीय दंडाधिकारी कविता जाधव , प्रमोद कुदळे व तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर गंडाळ , ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर मोकाटे, पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुधाकर मुंडे यांच्यासोबत सर्व गटविकास अधिकारी सर्व तालुका वैद्यकीय अधिकारी यांची उपस्थिती होती.दिनांक ८ जुलै ते ७ ऑगस्ट एक महिना कालावधीत जिल्हयातील प्रत्येक गावात अतिसार थांबवा, स्वच्छतेचे दोन रंग- ओला हिरवा, सुका निळा या नावाने अभियान राबविण्यात येत आहे. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या उपक्रमातून पिण्याच्या पाण्याचे सर्व स्त्रोत सुरक्षित करण्याची मोहीम याच अभियानामध्ये असल्याची माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-२ अंतर्गत राज्य .




### ..यांची होती उपस्थिती

कार्यशाळेत सर्व विषयाचे सादरीकरण श्री संजय मिसाळ व भारत नागरगोजे व अमोल कुलकर्णी यांनी केले. तर कार्यशाळेसाठी आरोग्य व ग्रामपंचायत विभागाचे विस्तार अधिकारी ,बाल विकास प्रकल्प अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्यासह कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## शासकीय रुग्णालयाचा गलथान कारभार!

दुर्लक्ष : सोनोग्राफी मशीन कशामुळे बंध

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज येथील शासकीय रुग्णालयात मनमानी कारभार चालु झाला आहे. रुग्णालयात आलेले रुग्णांनाचे हालबेहाल होत आहेत . दवाखान्यातील अधिकारी कर्मचारी ऐक ऐक महीना सुट्टीवर जातात तरी सुद्धा कुल्याही प्रकारचे वरीष्ठ अधिकारी लक्ष घालत नाही अशा कर्मचाऱ्यांना कुनाचा धाक नाही असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. कर्मचारी व अधिकारी यांचा मनमानी कारभार सुरू असल्याने केज रुग्णालयात येणारे रुग्न संतप्त झाले आहेत.तसेच दवाखान्यात असलेले शिपाई कर्मचारी रुग्णांना घेऊन येणाऱ्या नागरिकांना अरेरावीची भाषा वापरतात असे रुग्णालयातील रुग्णांनी मत व्यक्त केले आहे. तसेच दवाखान्यातील वरीष्ठ डॉक्टर कर्मचारी दवाखान्यात हजर नसतात असे मत नागरिकांन मधुन व्यक्त केले जात आहेत.तरी केज येथील अधिकाऱ्यांना ,कर्मचाऱ्यांना समज देण्याची आवश्यकता आहे असे नागरिकांतून भावना व्यक्त केल्या जात आहेत.तसेच दवाखान्यात असलेले कर्मचारी, वरीष्ठ अधिकारी नसल्यावर शासन फी पेक्षा जास्त पैसे घेत आहेत अशा भावना रुग्णालयातील रुग्णांन कडुन व्यक्त केल्या जात आहेत व दवाखान्यातील कर्मचारी वरीष्ठ अधिकारी डॉक्टर सत्तत गायब राहत असल्याने रुग्णांना खुप मोठा सामना करावा लागतो आहे.तसेच दवाखान्यातील डॉक्टर, अधिकारी यांना फोन केला असता त्यांचा फोन बंद येतो व आम्हाला दोन ठीकानचा चार्ज आहे असं सांगतात असे नागरिकांतून भावना व्यक्त केल्या जात आहेत.तसेच केज उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांची गैरसोय होत आहे व त्यांत कर्मचारी,डॉक्टर यांना तर वेळेचे भान राहीलेच नाही कधीही येतात कधीही जातात केज उपजिल्हा रुग्णालय

